
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा.
दा. क्र. : ९९९९

BVBK-0401111

वो.बो.
नों.क्र.१११७

म. ग्रं. सं. ठाणे या [redacted] शाखा.
बाल गट विभाग.
वा. क्र. १११७. दिनांक ......
विषय ...किशोर क्र. ...६०८...



# सुभेदाराची सून

शकुंतला बोरगावकर

BVBK-0401111

संजय
प्रकाशन पुणे ४

१९७९

संजय प्रकाशन : एकशे पंचाऐंशी

प्रथमावृत्ती : १४ जानेवारी १९७९
मकरसंक्रमण, शके १९००

प्रकाशिका :
श्रीमती ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन,
९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४.

© शकुंतला बोरगावकर



मुद्रक :
सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

मुखपृष्ठ व प्रसंग चित्रे :
जे. एम्. आर्टस्, पुणे.

मूल्य सहा रु



१

## बाळपणीचा काळ

सुमारे दोनशे-अडीचशे वर्षांपूर्वीचा तो काळ. थोरले बाजीराव लढाया जिंकत होते, अटकेपार झेंडे लावण्याच्या योजना आखीत होते. त्यांच्या महान यशाचा आणि कर्तबगारीचा हा काळ. शाहू राजे छत्रपती होते. थोरले बाजीराव मर्दुमकीने लढाया ...त होते.

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात सीना ...च्या काठी चोंडी नावाचे एक गाव आहे. ह्या गावाला चोंडी पडगाव असेही म्हणत. हे गाव आहे सोलापूर जिल्ह्यातील ...माळ्यापासून सात-आठ मैलांच्या अंतरावर. चोंडी गावचे ...टील माणकोजी शिंदे! माणकोजी फारच सज्जन माणूस. देवाधर्मावर अपार श्रद्धा. जातीचा धनगर. मेंढ्या पाळता-पाळता मधूनच तुकारामाचे अभंग तो आळवी! खंडोबाचा ...हान भक्त! रोज गावातील खंडोबाच्या देवळात जाऊन तो ...क्तिभावाने खंडोबाचे दर्शन घेई.

माणकोजीला पाच मुलगे. पाची मुलांवर त्याची फार माया. पण तरी माणकोजीला कसली तरी हुरहूर वाटे ! कधी कधी त्याला फार खंत वाटे ! त्याला मुलगी हवी होती. पोरीचे वागणे, चालणे कसे लाघवी असते ! तिला कसे नटवता, सजवता येते. हे पोरगे कसले...? मला एखादी तरी मुलगी हवी.

माणकोजीची पत्नी गरोदर होती. माणकोजी रोज खंडोबाच्या देवळात जाऊन प्रार्थना करी, 'देवा खंडोबा, मला एक कन्यारत्न दे ना ! मला पोरीची फार हौस !' खंडोबाचा भंडारा बायकोला देत तो म्हणायचा,

'बाईसाहेब, आता पोरगा नको बुवा आपल्याला. मला पोरगी हवी, अगदी माझ्या मालकिणी सारखी !'

माणकोजीची पत्नी लाजेने चूर झाली. पातळाचे काठ चुरता चुरताच ती दात चावून म्हणाली, 'पोरगी हवी मला सुद्धा. तिला नटवायला सजवायला किती आवडतं मला ! खंडोबाला नवस केलाय मी. कडक सोमवार करतेय. चतुर्थीचा उप[illegible] धरलाय !'

'वा ! वा ! मग काय, देवबाप्पा प्रसन्न होणारच. अ[illegible] बघ. चंपाषष्ठी आलीय. भरीत, रोडग्याचा आणि कां[illegible] पातीचा नैवेद्य साऱ्या गावाला देऊ या.' माणकोजी म्ह[illegible]

'आपण तर अगदी कर्णाचे अवतार ! जशी आपली मर्जी दोन्ही हातांनी भरभरून आपण देत आहात, देव आपली प्रार्थ[illegible] ऐकणारच !'

'मला तर बेटी फार आवडते. पोरीलाच आई-बाबांची [illegible] असते, ओढ असते पोरं काय मोठी झाली, की त्यांना [illegible]

फुटलीच, लग्न झाली की गेली बायकोच्या मुठीत ! मला एखादी तरी पोरगी हवीच !' माणकोजीचे हे बोलणे ऐकून त्याची बायको अगदी हसायलाच लागली.

'खंडोबाच्या कृपेनें आपल्याला मुलगी होऊ दे !'

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेचा दिवस. त्या दिवसापासून चंपाषष्ठी-पर्यंत सहा दिवस सटीचे नवरात्र असते. पहिल्या दिवशीच माणकोजीने खंडोबाची स्थापना करून त्याची पूजा केली. सहा दिवस अखंड नंदादीप लावला. पहिल्या दिवशी फुलांची एक माळ, दुसऱ्या दिवशी दोन असे क्रमाने वाढवीत जाऊन सहाव्या दिवशी सहा माळा घातल्या. रोज सकाळी व संध्याकाळी खंडोबाची पूजा करून आरती केली. चंपाषष्ठीच्या दिवशी माणकोजीने तळी आरती केली. 'खंडोबाचा येळकोट' म्हणत तबक तीन वेळा [illegible]ाळाला लावले, नारळ व भंडारा सर्वांना वाटून; पतंडोबापुढे गोंधळ घातला.

मग हे म ने जणू माणकोजीची प्रार्थना ऐकली. माणकोजीचे
ती र रावर होते. चोंडी येथील त्या पडक्या वाड्यात एका
जीव की याहां' केले ! पोरगी झाली म्हणून माणकोजीचा आनंद
'बाबा वेना. साऱ्या चोंडी गावात हिंडून हिंडून त्याने लोकांना
मला विठ वली— माझ्या घरात पोरगी आली !

चढता ये जीने साऱ्या गावाला साखर वाटली. आणि मोठ्या
खेळ खेळ चे नाव अहल्या ठेवले.

ती पोरगी
यांनी अहल्येची पत्रिका केली. त्या दिवशी ज्योतिषाने
'बेटा. 'माणकोजीराव, तुमची मुलगी राणी होणार ! तिच्या
ग्रहच सांगत आहेत. पोरीच्या हातून मोठा दानधर्म

होणार आहे. ती आपले नाव अमर करील !'

'ज्योतिषी बुवा, काय चेष्टा करता हो गरीबाची ? चोंडी गावच्या पाटलाची मुलगी राणी होणार ? शक्य तरी आहे का ?'

'पाटीलबुवा, ज्योतिष खरे झाले नाही तर माझे नाव बदला ! मी जगलो वाचलो तर येईनच तुमच्या मुलीच्या राज्यात. नाही-तर माझी आठवण तरी ठेवा.'

ह्यावर माणकोजीराव खळाळी हसतच सुटले ! मनाशी पुट-पुटले, 'माझी पोर राणी होणार !... पाच भावांची लाडकी बहीण आहे ही ! आईवडिलांची लाडकी एकुलती एक मुलगी आहे ती आमची राजकन्याच आहे ही !'

छोटया अहल्याचे आपल्या भावंडांवर फार प्रेम ! पाच भावांची एकुलती एक बहीण ती, सर्वांनी ...चे सारखे कौतुक करावयाचे, तिच्यावर माया करायची ! ..., ख खंडो...

एकदा मजाच झाली. अहल्याचे पाची ... ...ोबांचा उ...
खेळण्यात दंग झाले होते. वैशाखाचे रणरण ... जो...
फांद्या तोडून मुले विटी-दांडू करण्यात दं ... ' ट. अ...
अहल्या तिथे आली. तिला खेळायला छो... ...त म... का...
शेजारची कुलकर्ण्यांची पोर ही आपल्या ... ...नी पुर... म्ह...
होती छोटया अहल्येला कंटाळा ... ...माणकोपली मर्जी
बागेतील फुले तोडून आणली हो... ...हौसेने मुलीली प्रार्थ...
खलात कुटून ठेवले होते. आईल... ज्योति...
तरी तिचा वेळ जाता जाईना. शेजारचा ... ...वांची ...
खेळायला. ...ांना ...

'महादजीदादा, शहाजीदादा. मी तुमच्याबरोबर येऊ का खेळायला ? मला विटी-दांडू खेळता येतो. पतंग उडविता येतो, आटयापाटया खेळता येतात. इतकंच काय पण तुमच्यासारखं झाडावरसुद्धा चढता येतं ! आज माझ्याबरोबर खेळायला कोणी नाही.'

'तुझी मैत्रीण, ती उमा कुठे गेली ?' शहाजीदादाने जरा रागातच विचारले.

'ती गेली आहे आपल्या आजीकडे ! माझ्याशी खेळायला कोणी नाही ! म्हणून तर विचारते, मी येऊ का तुमच्याशी खेळायला ?'

'छे ! छे ! तू पोरगी, आमच्यात खेळायला नाही यायचंस ! तुम्ही खेळा चूल-बोळकी, बाहुला-बाहुली ! पतंग, विटी-दांडू हे आम्हा मुलांचे खेळ तू खेळणार का ? जा घरात !'

अहल्या रडूच लागली ती विचार करू लागली, 'मला विटी-दांडू, पतंग खेळायला येतो, झाडावर सुद्धा चढता येतं. आणि मग हे मला खेळायला का नाही घेत ?'

ती रडतच आपल्या बापाकडे गेली. अहल्या म्हणजे माणकोजीची जीव की प्राण !

'बाबा महादजीदादा, शहाजीदादा मला खेळायला घेत नाहीत. मला विटी-दांडू खेळता येतो, पतंग खेळता येतो. झाडावरसुद्धा चढता येतं. ते म्हणतात, तू पोरगी. तू भातुकली, बाहुला-बाहुलीचा खेळ खेळत जा. आमच्यात येऊ नको !' आणि एवढं बोलून ती पोरगी बापाला बिलगून रडूच लागली !

'बेटा, रडू नको. ते महादजी, शहाजी वेडे आहेत. खेळू देत

त्या पोरांना. मी खेळतो चल तुझ्याशी विटी-दांडू !'

अहल्येने परकराने डोळे पुसले. केस मागे सारले आणि मग ती काचा मारून खेळायला निघाली.

माणकोजीने झाडाची एक फांदी तोडली. विटी-दांडू तयार केला आणि तो आपल्या मुलीबरोबर विटी-दांडू खेळू लागला !



थोड्या वेळापूर्वी रडणारी अहल्या आता खुदखुदू हसू लागली होती ! दांडूने विटी दूर दूर मारू लागली होती !

'बेटा, तू खरंच छान खेळतेस. आता गावात जत्रा आली मी तुला रंगीत विटी-दांडू घेऊन देईन !'

माणकोजी पोरीच्या पाठीवरून मायेने हात फिरवीत ह
'खूप लाड झाले हो ! एकुलती पोरगी म्हणून तुम्ही तिचे फा

लाड करता ! माझी पाची पोरं, त्यांना कुणी बी विचारीत नाय !'

'ते पाच पोरगे तुजे, माझी ही लाडकी अहल्या !'

इतक्यात शहाजी खेळून दमून आला व म्हणाला,

'ऐलू, तू छान खेळतीस ग !'

'मग मला खेळायला का नाही घेतलंस ?' अहल्याने नाक फुगवून विचारलं !

'आम्हाला कुठे माहीत होतं. की आमची बहीण विटी-दांडू इतकं छान खेळते ! आता ह्या दिवाळीला आमच्या अहल्या-राणीला नवा कोरा विटी-दांडूच ओवाळणी घालायचा ! परकर चोळीचा खण नाही द्यायचा !'

'काही नको, मला खेळायला घेत नाही तुम्ही. आज माझी उमा खेळायला नव्हती म्हणून तर मी तुमच्याशी खेळायला येऊ का म्हणून विचारलं. ! मला आता बाबा नवा रंगीत विटी-दांडू आणून देणार आहेत !'

'आमची बहीण रुसली, आई ग, आज दोन भाकरी जास्त कर ! बहिण रुसली की दोन भाकरी जास्त खाणार !'

भावाची चेष्टा ऐकून रुसलेली, फुगलेली अहल्या खुदकन् हसू लागली.

इतक्यात महादजी पण आला. तो आपल्या बहिणीला म्हणाला, 'ऐलू आमची रुसली ! ऐलू आमची रुसली ! पण आम्हाला कुठे माहीत होतं की, आमची बहिण, विटी-दांडू इतके छान खेळते. चल, शहाजी आपण सर्वजण अहल्याशी विटी-दांडूचा खेळ खेळू या.'

मग अहल्येचे पाच भाऊ जमा झाले आणि आपल्या लाडक्या एकुलत्या एक बहिणीशी तें सारेजण विटी-दांडू खेळू लागले.

आपल्या लेकरांचा तो खेळ पाहता पाहता माणकोजीच्या डोळ्यांत आनंदाश्रू गोळा झाले.

छोट्या अहल्येला आणखी एका गोष्टीची फार आवड होती. तिची आजी तिला पुराणातल्या गोष्टी सांगे ! रात्री झोपताना छोट्या अहल्येला गोष्टीची गोळी लागायचीच ! आजीच्या मायेच्या कुशीत शिरून अहल्या तिला ' गोष्ट सांग, गोष्ट सांग,' म्हणून एकसारखा आग्रह करायची. अहल्येला रामायणमहाभारतातील गोष्टी फार फार आवडत ! त्यातल्या त्यात छोट्या अहल्येवर सीतेच्या पवित्र जीवनाचा फार परिणाम झाला.

' आजी, मला ही दुष्ट कैकयी मुळीच आवडत नाही. तिनेच रामाला वनात पाठविलं !'

' अग, बायका तशाच. त्यांना वाटतं, आपल्या मुलाला राज्य मिळावं, तो राजा व्हावा, वैभवात राहावा. असं प्रत्येक आईला वाटणारच !' आजी छोट्या अहल्येची समजुत घाली.

' पण आजी, तिने रामाला वनात का पाठविलं ? त्यामुळे राजा दशरथ पुत्रशोकाने राम, राम करीत मरण पावला, कैकयीमुळेच राजा दशरथ मरण पावला !'

' तुला कोण आवडते !' आजी अहल्येला विचारी.

' आजी ग, मला सर्वात सीतामाई आवडते. ती कशी सर्वांशी प्रेमाने वागते. मीसुद्धा मोठी झाल्यावर सीतामाईसारखीच होणार !'

' शाबास बेटा !' आजी अहल्येची पाठ थोपटे !

'आजी, मला तू सीतेचीच गोष्ट सांग आणि उद्या शिवाजी महाराजांच्या आईची, जिजाबाईची गोष्ट सांग !'

आजी मग छोटचा अहल्येला जिजाबाईची गोष्ट सांगे. पुराणाची, इतिहासाची अहल्येला फार गोडी लागली. पुराणातील गोष्टी ऐकण्याचा रोजचा कार्यक्रम अबाधित झाला होता. एकदा आजीने तिला पुराणातील अहल्येची गोष्ट सांगितली, गौतम मुनीची पत्नी अहल्या प्रभु रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झाली. छोटचा अहल्येला ही गोष्ट फार आवडली. ती आजीला म्हणाली, 'आजी, मी पण त्या अहल्येसारखीच थोर होणार ! प्रभु रामचंद्र मला दर्शन देतील का ?' आजीला नातीचे फार कौतुक वाटले. तिने आपल्या छोटचा नातीला पोटाशी धरले.

□

२

## मल्हारराव होळकर

फलटण जहागिरीत नीरेच्या काठी होळ नावाचे गाव आहे. मल्हारराव तेथलाच राहणारा. त्याचे खरे नाव वीरकर असे होते. नंतर त्यांचे होळ या गावावरून होळकर हे नाव पडले. ह्या होळ गावातच खंडोजी नांवाचा एक गृहस्थ राहात असे. त्याची जात धनगर. तो चौगुला-- ग्रामाधिकारी ! खंडोजी हा अतिशय साधा गृहस्थ होता. आपण बरे आणि आपले काम बरे अशा वृत्तीचा. देवाचं भजन करण्यातच त्याचा रिकामपणचा वेळ खर्च होई.

ह्या खंडोजी होळकराला मल्हारी नावाचा एकुलता एक मुलगा होता. चैत्र शुद्ध नवमी. रामनवमीचा पवित्र दिवस. त्याच दिवशी दुपारी बारा वाजता रामजन्माच्या शुभ समयासच खंडोजीला पुत्रप्राप्ती झाली ! खंडोजीचा आनंद गगनात मावेना! आपला पुत्र मोठ्या भाग्याचा ठरणार...पण बिचारा खंडोजी,

आपल्या मुलाचे भाग्य पाहण्यापूर्वीच मरण पावला. मल्हारी तीन वर्षांचा असतानाच त्याच्या डोक्यावरचे पितृछत्र उडाले! मल्हारीच्या नातेवाइकांना, भाऊबंदांना ही चांगलीच संधी चालून आली. तीन वर्षांचे बापाविना पोर, त्याची सारी संपत्ती त्यांनी गिळंकृत केली! मल्हारीची आई असहाय झाली होती. पतीमागे तिला तीन-चार वर्षांच्या त्या कोवळ्या पोराचाच आधार होता. राहता वाडा, दागदागिने, जमीनजुमला सारा भाऊबंदांनी गट्ट करून टाकला. बिचारी जिवाई आधीच पतिवियोगाने दुःखीकष्टी झालेली, पदरी छोटासा जीव आणि त्यातच नातेवाइकांनी असा दुष्टपणा आरंभिला! हे भाऊबंद असल्या भाऊबंदकीने वेडे झालेले, प्रसंग पडल्यास आपल्या एकुलत्या एक पोराचा प्राण घेण्यासही कमी करणार नाहीत! या भीतीने रात्री कधी तिच्या डोळ्याला डोळा लागला नाही. 'परमेश्वरा, माझ्या पोटच्या पोराला वाचव! माझी सारी धन-दौलत ह्या नातेवाइकांना घेऊ दे! मला एक पैसुद्धा नको. फक्त माझा पोर खुशाल असू दे!'

भाऊबंदकीला कंटाळून, आणि घाबरून जिवाई आपल्या मुलाला घेऊन आपला भाऊ भोजराज ह्याच्या घरी जाऊन राहिली. खानदेश जिल्ह्यात तळोदे म्हणून एक गाव आहे तेथे सावाजी बाबा या नावाचा चौगुला होता. भोजराज हा त्याचा मुलगा. मल्हारीचा तो मामा. कंठाजी कदमबांडे यांच्या पागेत भोजराजाचं पंचवीस स्वारांचं पथक होतं. आपल्या बहिणीला कुणाचाच आश्रय नाही, पतीच्या मृत्यूनंतर सारे भाऊबंद तिचा छळ करीत आहेत, ही बातमी समजल्यावर भोजराजाला फार वाईट वाटलं. त्याने आपल्या बहिणीला व भाच्याला आपल्याच

पाहिलं. झाडाच्या पर्णसंभारातूनही उन्हाचं
पोराच्या अंगावर पडत होते. नागराजाचं
करीत तो पुढे धावला व त्याने त्या मुलाच्य
फडा धरला. नागराजाच्या फण्याच्या छा
होता.

इतक्यात त्याची आई, पोरासाठी आणखी
भाकरी घेऊन तिथे आली. हा सारा प्रकार
तोंडचं पाणीच पळालं. नवऱ्यामागे वाढविलेलं
नशिबात आहे कुणास ठाऊक. धावत ध
आपल्या भावाला आणि इतर मंडळींना ति
गर्दी, आवाज, गोंगाट एकून नागोबा शांतपणे
निघून गेले. आपल्या मुलाला काहीएक दुखापत
पाहून त्या माऊलीला केवढा आनंद झाला!
आभार मानले, 'खंडोबाराया, माझ्यावर केवढ

तिने आपल्या लाडक्या मल्हारीला तिथेच ख
जमलेल्या साऱ्या लोकांना दूधभाताचं जेवण
अरिष्ट टळलं! जिवाईने परमेश्वराचे आभार
जिवाईला राहून राहून ह्या अलौकिक प्रसंगाची
होती. गावातील ओळखीचे चार-दोन वृद्ध धनग
जिवाईने ही सारी हकीगत सांगितली. तिच्या म
वाईट विचारांचा झगडा चालला होता. 'आजोबा
अर्थ तरी काय?' शेवटी जिवाईने त्यांना प्रश्न के

ते बिचारे बोलून चालून धनगर. ते काय सांग
कुठे पोथ्या-पुराणं वाचलेली?

बिचारी जिवाई भेटेल त्याला ही घटना वर्ण

घरी ठेवून घेतलं. बिचाऱ्या जिवाईची भावाच्या मायेमुळेच त्या भाऊबंदकीतून सुटका झाली. मल्हारीने आपल्या मामाच्या घरी मेंढरं चारावयाचं काम हाती घेतलं. आठ वर्षांचा पोर मेंढरं घेऊन दूरदूर रानात जाई.

मल्हारीने एके दिवशी नेहेमीप्रमाणे मेंढरं चरावयास नेली होती. दुपारचं रणरणतं ऊन. मल्हारीने फडक्यात बांधून आणलेली भाजी-भाकर खाल्ली. लोटचातील थंडगार पाणी पिऊन टाकले. आईने रोजच्या पेक्षा भाकर जरा जास्तच दिली होती. छोटचा मल्हारीच्या डोळचांवर झोप येऊ लागली. तिथेच एका विस्तीर्ण वृक्षाखाली मल्हारी झोपी गेला. आधीच उन्हाने तो थकून गेला होता. वृक्षाच्या गार सावलीत मल्हारीला गाढ झोप लागली ! त्या झाडाखाली जवळच एक वारुळ होते. त्यातून एक मोठा नाग बाहेर आला. नागराजाने ते कोवळं पोर गाढ झोपीं गेलेलं



पाहिलं. झाडाच्या पर्णसंभारातूनही उन्हाची तीक्ष्ण किरणे त्या पोराच्या अंगावर पडत होते. नागराजाचं हृदय द्रवलं. सळसळ करीत तो पुढे धावला व त्याने त्या मुलाच्या तोंडावर आपला फडा धरला. नागराजाच्या फण्याच्या छायेत मुलगा झोपला होता.

इतक्यात त्याची आई, पोरासाठी आणखी थोडी गरम गरम भाकरी घेऊन तिथे आली. हा सारा प्रकार पाहताच तिच्या तोंडचं पाणीच पळालं. नवऱ्यामागे वाढविलेलं पोर. काय याच्या नशिबात आहे कुणास ठाऊक. धावत धावत जाऊन तिने आपल्या भावाला आणि इतर मंडळींना तिथे नेलं. मनुष्यांची गर्दी, आवाज, गोंगाट एकून नागोबा शांतपणे आपल्या बिळात निघून गेले. आपल्या मुलाला काहीएक दुखापत झाली नाही हे पाहून त्या माऊलीला केवढा आनंद झाला! तिनें खंडोबाचे आभार मानले, 'खंडोबाराया, माझ्यावर केवढी दया केलीस!'

तिने आपल्या लाडक्या मल्हारीला तिथेच खाऊ घातलं आणि जमलेल्या साऱ्या लोकांना दूधभाताचं जेवण दिलं! केवढं अरिष्ट टळलं! जिवाईने परमेश्वराचे आभार मानले. भोळ्या जिवाईला राहून राहून ह्या अलौकिक प्रसंगाची आठवण येत होती. गावातील ओळखीचे चार-दोन वृद्ध धनगर होते. त्यांना जिवाईने ही सारी हकीगत सांगितली. तिच्या मनात चांगल्या-वाईट विचारांचा झगडा चालला होता. 'आजोबा, ह्या सर्वांचा अर्थ तरी काय?' शेवटी जिवाईने त्यांना प्रश्न केला.

ते बिचारे बोलून चालून धनगर. ते काय सांगणार? त्यांनी कुठे पोथ्या-पुराणं वाचलेली?

बिचारी जिवाई भेटेल त्याला ही घटना वर्णन करून सांगू

लागली. शेवटी एका बाईनं तिला सुचविलं, 'बाई, तू ही गोष्ट एखाद्या ब्राह्मणास पूस. मग जिवाईनें एका ब्राह्मणाग विचारले. ब्राह्मणाने जिवाईच्या तोंडून सारी घटना ऐकून घेतली. आणि थोडा वेळ विचार करून 'बाई, हा मुलगा राजा होईल. हा दहा वर्षांचा होईपर्यंत ह्याला तू फार जप. पुढे हा एका राज्याचा सांभाळ करील. तू राजमाता होशील !'

जिवाई धन्य झाली. तिने खंडोबाची प्रार्थना केली. नागाने तोंडावर फणा धरणं हा चांगला शकुन समजतात. मल्हारजीवर घरच्या सर्वांची माया जडली. जो तो म्हणू लागला, 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.'

त्या दिवसापासून मामाने मल्हारीला रानात जाऊन मेंढ्या राखण्याचं काम बंद करण्यास सांगितलं. मामांचा मल्हारी लाडका भाचा ठरला. इतकेच काय, मामांनी आपली मुलगी गौतमा हिच्याशी मल्हारीचं लग्न लावून दिलं. या वेळी मल्हारीचं वय केवळ आठ वर्षांचं होतं ! गौतम त्याच्यापेक्षा फक्त सव्वा वर्षांनी लहान होती.

मल्हारीच्या मामीला हे लग्न एवढं पसंत नव्हतं. ती जरा कुरकूर करू लागली. मल्हारीला त्याचं फार वाईट वाटलं.

लवकरच मल्हारजीचा भाग्योदय होऊ लागला. त्याचा मामा भोजराज ह्याने त्याला आपल्या पथकात एक प्रमुख जागा दिली. मल्हारीने आपल्या गुणांनी खूप मोठी कामगिरी केली. त्याने शौर्याने खूप लढाया जिंकल्या. खानदेशातील अणकाई नावाचा किल्ला त्याने जिंकला.

पुढे लवकरच निजामाशी मराठ्यांचा सामना झाला. त्यात मल्हारीने निजामाच्या एका मोठ्या पुढाऱ्यास कंठस्नान घातल

बाजीराव लहान असतानाच त्याची व मल्हारजीची एकदा छोटीशी झटपट झाली. त्याचं शौर्य श्रीमंतांच्या चांगलंच लक्षात राहिलं. निजामाच्या लढाईनंतर लवकरच श्रीमंतांच्या फौजेची व बांडयांच्या फौजेची तापी नदीच्या काठी लढाई झाली. मल्हारीने ती मोठया चातुर्याने, शौर्याने मिटविली. श्रीमंतांना मल्हारीचं शौर्य पाहून, त्याची चतुराई पाहून खूपच आनंद झाला. त्यांना हा तरुण वीर फारच आवडाला. पुढे लढाई संपल्यावर श्रीमंतांनी मल्हाररावास कदमबांडे ह्यांच्याकडून मागून घेतलं. आपल्या ह्या सेवकाचा पेशव्यांच्या पदरी मोठा भाग्योदय होईल, असा विचार करून कंठाजी कदमबांडयांनी मल्हाररावास श्रीमंतांकडे जाण्याची परवानगी दिली.

बाजीराव पेशव्यांनी मल्हारजीस पाचशे स्वारांची मनसब दिली.

कंठाजीच्या उदारपणामुळेच आपला एवढा सन्मान झाला. कंठाजीमुळेच आपली एवढी भरभराट झाली. मल्हारराव कंठाजी कदमबांडयांचे उपकार कधीच विसरला नाही. त्यांच्या स्मरणार्थ त्याने बांडयांचा झेंडा ज्या रंगाचा होता त्याच रंगाचा आपला झेंडा केला.

दिवसेंदिवस मल्हारजी यशाचीच पायरीचढू लागला. त्याला नर्मदेच्या उत्तरेस खानदेशात बारा परगणे मिळाले. चार वर्षांच्या आत ही संख्या चौऱ्याऐंशी पर्यंत गेली. ह्यावरूनच मल्हारीची कामगिरी आपल्या लक्षात येते.

मल्हारजीला पुष्कळ बायका होत्या. पण त्या सर्वांत गौतमाबाई ही त्याची पट्टराणी होती. लग्नात ती जेमतेम पावणेसात वर्षांची होती.

गौतमाबाई ही फार सज्जन स्त्री होती. पतीवर तिची अमार भक्ती. पुष्कळदा ती आपल्या नवऱ्याबरोबर युद्धातही जात असे. युद्धाच्या वेळी ही शूर स्त्री आपल्या पतीला केवढं उत्तेजन देई. त्याच्या साऱ्या चिंता दूर करी. तिला आपल्या कर्तव्याचा कधीच विसर पडला नाही.

पेशव्यांचे गुरू ब्रह्मेंद्र स्वामी त्यांच्या ठिकाणी गौतमा बाईंची अपार श्रद्धा. त्यांच्या चरणी बाईंनी आपली सेवा अर्पण केली.

दिवसेंदिवस मल्हाररावाचा भाग्योदय होत होता. गौतमाबाईंची तपश्चर्या फळाला आली. दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर तिला पुत्रप्राप्ती झाली. मल्हारजी केवढा सुखावला. खंडोबा पावला म्हणून त्याने सर्वांना मिठाई वाटली. सगळीकडे केवढा आनंदोत्सव साजरा झाला. खंडोबा हे होळकरांचं आराध्य दैवत म्हणून मल्हारजींने आपल्या प्रथम-पुत्राचे नाव खंडेरावच ठेवलं.

□

३

## अहल्याबाईचा विवाह

खंडेराव आता नऊ-दहा वर्षांचा झाला होता. गौतमाबाई आणि मल्हारजी सूनमुख पाहण्यास फार उत्सुक झाले होते.

‘ किती दिवस सांगते, आपण ऐकतच नाही. ह्या घरात सूनबाई नको का यायला ? हे घर आता नव्या गृहलक्ष्मीची वाट पाहत आहे ! सूनमुख पाहण्यासाठी मी किती उत्सुक झाले आहे! ’

‘ हो, हो. जरा धीर धरा. मी सुद्धा चांगलीशी मुलगी शोधतच आहे.’

मल्हारजींच्या मागे अनेक कामं. एकदा असेच ते काही कामासाठी चोंढे गावाला गेले होते. इकडची तिकडची कामं झाली आणि मग मल्हारजी महादेवाच्या दर्शनाला गेले. चोंढे गावातील शंकराचं देऊळ मोठं रम्य स्थान. नदीच्या काठी टुमदार देऊळ आहे. मल्हारजींनी देवाचं दर्शन घेतलं. शिवलिंगाजवळ शंभूचीच ही कृपा दिसतेय. ’ मल्हा[illegible] केली, ‘ शिवशंभो, माझ्या

पोराला चांगली बायका ।मळू ५ ५.
सोमवारचे व्रत करील !'

थकला भागलेला मल्हारजी तेथेच देवळात एका खांबाला जरासा टेकून बसला. डोक्यात पोराच्या लग्नाचेच विचार चालले होते ! 'आता काही आपण साधेसुधे धनगर राहिलो नाही. आपण एका प्रांताचे जवळ जवळ राजे बनलो आहोत. पदरी पैकाही बराच आहे. एकुलता एक मुलगा. आपल्या इतमामास शोभेल अशा कुळातील मुलगी आपल्या एकुलत्या एक मुलास मिळावी. पण आजकाल सोयरीक करण्याजोगे धनगर कुळात राजे तरी कुठे आहेत ? आपल्या धनगरात श्रेष्ठ कुटुंबं म्हणजे पाटलांची. एखाद्या पाटलाचीच पोरगी बघू या खंडेरावासाठी ! विचारांच्या गुंगीतच मल्हाररावाचा डोळा लागला.

थोडया वेळाने तो जागा झाला. डोळे चोळतच तो इकडे तिकडे बघू लागला. त्याने आळसावून एक जांभई दिली. प्रवासाने तो थकला होता. क्षणभराची ती डुलकी घेतल्यामुळे त्याला जरा बरं वाटलं. इतक्यात एक चिमुरडी मुलगी परकर सावरीत तेथे देवळात आली. गाभाऱ्यात जाऊन तिने शिवलिंगावर बेलाची पानं वाहिली, फुलं वाहिली. मनोभावे नमस्कार केला. आणि बाहेर येऊन जरा टेकली. समोरच बसलेला मल्हारजी त्या मुलीकडे पाहू लागला. तिची प्रत्येक हालचाल तो मोठ्या बारका-ईने निरखू लागला. त्याला ती मुलगी फार आवडली. दिसायला तशी दहाजणींसारखीच. पण तिच्या चेहऱ्यावर एक आगळेच तेज दिसत होते ! तिने किती मनोभावे देवाची प्रार्थना केली !
एवढ्याशा वयात देवळात ये—
मल्हाररावांच्या डोळ्या—

अहल्या. पळून गेली, खेळखेळ खेळायला पण इकडे साधुमहाराजांचं आशीर्वाद देण्याचं कार्य चालूच...अहल्या तिथे ऐकायलाही नव्हती. मीच ऐकत होतो. आणि मनाशी हसत होतो. म्हणे [illegible] होईल. राज्य करेल.' माणकोजी जोरजोरात [illegible] ...करून पुढे होऊन विचारलं

'बाबा, तुम्ही थकला आहात का? [illegible] का? नाहीतर आमच्या घरी येता का? [illegible] तुम्हाला जरा ताजंतवानं वाटेल.'



हाव [illegible]

सूनल्हाररावाला त्या मुलीचं मोठं कौतुक वाटलं. ही मुलगी [illegible]ली सूनबाई व्हावी. त्याने मनोमन शिवाची प्रार्थना केली. [illegible] शंभूचीच ही कृपा दिसतेय.' मल्हारराव मनाशी पुटपुटला.

पोराला चांगली बायको मिळू दे रे! माझी कारभारीण सोळा सोमवारचे व्रत करील!'

थकला भागलेला मल्हारजी तेथेच देवळात एका खांबाला जरासा टेकून बसला. डोक्यात पोराच्या लग्नाचेच विचार चालले होते! 'आता काही आपण साधेसुधे धनगर राहिलो नाही. आपण एका प्रांताचे जवळ जवळ राजे बनलो आहोत. पदरी पैकाही बराच आहे. एकुलता एक मुलगा. आपल्या इतमामास शोभेल अशा कुळातील मुलगी आपल्या एकुलत्या एक मुलास मिळावी. पण आजकाल सोयरीक करण्याजोगे धनगर कुळात राजे तरी कुठे आहेत? आपल्या धनगरात श्रेष्ठ कुटुंबं म्हणजे पाटलांची. एखाद्या पाटलाचीच पोरगी बघू या खंडेरावासाठी! विचारांच्या गुंगीतच मल्हाररावाचा डोळा लागला.

थोड्या वेळाने तो जागा झाला. डोळे चोळतच तो इकडे तिकडे बघू लागला. त्याने आळसावून एक जांभई दिली. प्रवासाने तो थकला होता. क्षणभराची ती डुलकी घेतल्यामुळे त्याला जरा बरं वाटलं. इतक्यात एक चिमुरडी मुलगी परकर सावरीत तेथे देवळात आली. गाभाऱ्यात जाऊन तिने शिवलिंगावर बेलाची पानं वाहिली, फुलं वाहिली. मनोभावे नमस्कार केला. आणि बाहेर येऊन जरा टेकली. समोरच बसलेला मल्हारजी त्या मुलीकडे पाहू लागला. तिची प्रत्येक हालचाल तो मोठ्या बारकाईने निरखू लागला. त्याला ती मुलगी फार आवडली. दिसायला तशी दहाजणींसारखीच. पण तिच्या चेहऱ्यावर एक आगळेच तेज दिसत होते! तिने किती मनोभावे देवाची प्रार्थना केली! एवढ्याशा वयात देवळात ग

मल्हाररावांच्या डोक

ही जोडीदारीण चांगली शोभेल. किती तेजस्वी आहे तिचा चेहरा.

त्या मुलीनेही मल्हाररावाकडे बघितलं. तिच्या छोटया डोक्यात विचार आला. हे बाबा थकले भागलेले दिसताहेत. तिने चटकन् पुढे होऊन विचारलं,

'बाबा, तुम्ही थकला आहात का ? मी पाणी आणून देऊ का ? नाहीतर आमच्या घरी येता का ? गूळ-पाणी घ्या म्हणजे तुम्हाला जरा ताजंतवानं वाटेल.'



हा

सूनल्हाररावाला त्या मुलीचं मोठं कौतुक वाटलं. ही मुलगी 'ली सूनबाई व्हावी. त्याने मनोमन शिवाची प्रार्थना केली. शंभूचीच ही कृपा दिसतेय.' मल्हारराव मनाशी पुटपुटला.

'चल बाळ, तुझ्या घरीच येतो.' मल्हाररावाने त्या मुलीच्या घरी जाण्याचा विचार अंमलात आणला.

मल्हाररावजींच्या आगमनाने माणकोजीला फारच आनंद झाला. माणकोजीने पाहुण्याला गूळ-पाणी दिलं आणि मोठ्या आग्रहाने जेवायलाही ठेवून घेतलं.

'तुमच्या कन्येने मला गूळ-पाणी घ्यायला बोलावलं माणकोजी-राव, आणि तुम्ही तर आता जेवायचाच आग्रह करू लागलात !' असं म्हणून मल्हारराव खो खो हसू लागले.

'आमची अहल्या म्हणजे लाखातली पोर आहे बघा. तिचं मन इतकं दयाळू आहे. अगदी लोण्यासारखं मऊ !'

'माणकोजीराव, तुमची लेक मला फार आवडली.' प्रस्तावना कशी करावी ते मल्हाररावाला उमगेनाच.

'मल्हारजी, ऐकाच तुम्ही. ही माझी पोर – आता माझी पोरगी म्हणून मी तिचं कौतुक करीत नाही. तुम्हीच ठरवा आता. परवा एकादशी होती. दारात एक साधू उभा. खंडोबाचा जयघोष करीत. आमची अहल्या पडवीत होती. एकदम कोठीच्या खोलीत धावत धावत गेली. आणि कणगीतून ओंजळभर भुई-मुगाचे दाणे आणून तिने त्या साधूच्या वाडग्यात टाकले. मी जरा रागावलोच. ओंजळभर दाणे कशाला घातलेस ? मी ओरडलो तर म्हणाली, बाबा, आज एकादशी आहे. साधू-महाराजांना फराळाचं नको का ? मी चूप राहिलो...f साधू अहल्येवर आशीर्वादांचा वर्षाव करीत होता.

'बेटी, तू राजाची राणी होशील. सिंहासनावर म दानधर्म करशील...तुझी कीर्ती सगळीकडे पसरेल...'

मल्हाररावजी, त्या साधूच्या कटोऱ्यात दाणे टाकून आमच

अहल्या. पळून गेली, खेळखेळ खेळायला पण इकडे साधुमहाराजांचं आशीर्वाद देण्याचं कार्य चालूच...अहल्या तिथे ऐकायलाही नव्हती. मीच ऐकत होतो. आणि मनाशी हसत होतो. म्हणे राजाची राणी होईल. राज्य करेल.' माणकोजी जोरजोरात हसू लागले.

मल्हाररावाला आता चांगलीच संधी मिळाली होती विषय काढायला.

'माणकोजीराव, त्या साधुमहाराजांचं भविष्य खरं ठरणार!' मल्हाररावाने लोडाला टेकत बोलायला सुरुवात केली.

'छे, हो. मल्हाररावजी, तुम्ही पण गरीबाची चेष्टा करता हो!'

'नाही हो, चेष्टा नाही करत, खरं तेच सांगतो, माझ्या खंडेरावाला देणार का तुमची अहल्या? मला अशीच गुणी सूनबाई हवी आहे.' मल्हाररावाने एका दमात सारं सारं स्पष्ट सांगून टाकलं. माणकोजीने झटकन मल्हाररावाचे पायच धरले. त्याचे डोळे कृतज्ञतेने भरून आले.

'रावजी, आपली मोठी कृपाच आहे ही! माझी अहल्या मोठी नशीबवानच दिसतेय पण महाराज, मी पडलो साधासुधा. चोंढेसारख्या कुठल्यातरी कोना-कोपऱ्यात असलेल्या गावचा पाटील. माझ्याजवळ नाही फारशी जमीन, नाही पैका, नाही दागदागिना!'

'माणकोजीराव, मला जमीन, पैका, दागदागिना ह्यांची काही हाव नाही. सोनं माझ्यापाशी रगड आहे. मला हवी सोन्यासारखी सूनबाई! तुमची अहल्या मला फार आवडली. माझ्या घराची लक्ष्मी होऊ दे!'

'चल बाळ, तुझ्या घरीच येतो.' मल्हाररावाने त्या मुलीच्या घरी जाण्याचा विचार अंमलात आणला.

मल्हाररावजींच्या आगमनाने माणकोजीला फारच आनंद झाला. माणकोजीने पाहुण्याला गूळ-पाणी दिलं आणि मोठ्या आग्रहाने जेवायलाही ठेवून घेतलं.

'तुमच्या कन्येने मला गूळ-पाणी घ्यायला बोलावलं माणकोजी-राव, आणि तुम्ही तर आता जेवायचाच आग्रह करू लागलात!' असं म्हणून मल्हारराव खो खो हसू लागले.

'आमची अहल्या म्हणजे लाखातली पोर आहे बघा. तिचं मन इतकं दयाळू आहे. अगदी लोण्यासारखं मऊ!'

'माणकोजीराव, तुमची लेक मला फार आवडली.' प्रस्तावना कशी करावी ते मल्हाररावाला उमगेनाच.

'मल्हारजी, ऐकाच तुम्ही. ही माझी पोर – आता माझी पोरगी म्हणून मी तिचं कौतुक करीत नाही. तुम्हीच ठरवा आता. परवा एकादशी होती. दारात एक साधू उभा. खंडोबाचा जयघोष करीत. आमची अहल्या पडवीत होती. एकदम कोठीच्या खोलीत धावत धावत गेली. आणि कणगीतून ओंजळभर भुई-मुगाचे दाणे आणून तिने त्या साधूच्या वाडग्यात टाकले. मी जरा रागावलोच. ओंजळभर दाणे कशाला घातलेस? मी ओरडलो तर म्हणाली, बाबा, आज एकादशी आहे. साधु-महाराजांना फराळाचं नको का? मी चूप राहिलो...

साधू अहल्येवर आशीर्वादांचा वर्षाव करीत होता.

'बेटी, तू राजाची राणी होशील. सिंहासनावर म दानधर्म करशील...तुझी कीर्ती सगळीकडे पसरेल...'

मल्हाररावजी, त्या साधूच्या कटोऱ्यात दाणे टाकून आमच

अहल्या. पळून गेली, खेळखेळ खेळायला पण इकडे साधुमहाराजांचं आशीर्वाद देण्याचं कार्य चालूच...अहल्या तिथे ऐकायलाही नव्हती. मीच ऐकत होतो. आणि मनाशी हसत होतो. म्हणे राजाची राणी होईल. राज्य करेल.' माणकोजी जोरजोरात हसू लागले.

मल्हाररावाला आता चांगलीच संधी मिळाली होती विषय काढायला.

'माणकोजीराव, त्या साधुमहाराजांचं भविष्य खरं ठरणार !' मल्हाररावाने लोडाला टेकत बोलायला सुरुवात केली.

'छे, हो. मल्हाररावजी, तुम्ही पण गरीबाची चेष्टा करता हो !'

'नाही हो, चेष्टा नाही करत, खरं तेच सांगतो, माझ्या खंडे-रावाला देणार का तुमची अहल्या ? मला अशीच गुणी सूनबाई हवी आहे.' मल्हाररावाने एका दमात सारं सारं स्पष्ट सांगून टाकलं. माणकोजीने झटकन मल्हाररावाचे पायच धरले. त्याचे डोळे कृतज्ञतेने भरून आले.

'रावजी, आपली मोठी कृपाच आहे ही ! माझी अहल्या मोठी नशीबवानच दिसतेय पण महाराज, मी पडलो साधासुधा. चोंढेसारख्या कुठल्यातरी कोना-कोपऱ्यात असलेल्या गावचा पाटील. माझ्याजवळ नाही फारशी जमीन, नाही पैका, नाही दागदागिना !'

'माणकोजीराव, मला जमीन, पैका, दागदागिना ह्यांची काही हाव नाही. सोनं माझ्यापाशी रगड आहे. मला हवी सोन्यासारखी सूनबाई ! तुमची अहल्या मला फार आवडली. माझ्या घराची लक्ष्मी होऊ दे!'

'खंडोबाची कृपा. माझ्या गरीबाचं भाग्य आज उजळलं!'

'बरं, मग मी उठतो आता. पुढल्या आठवडयात बोलणी करू या!' मल्हारराव उठले. त्यांना घरी जाण्याची गर्दी होती.

'वा! वा! तुम्ही आता आमचे व्याही होणार आणि नुसत्या गूळ-पाण्याने का तुमचं स्वागत करू? कारभारणीला सांगतो, पुरण घाल. गरीबाच्या घरची पुरणपोळी तर बघा. आणि आमची बायको पुरणपोळ्या एकदम फक्कड करते बघा!'

माणकोजीने आत जाऊन कारभारणीला सारी हकीगत सांगितली. तिने दाराच्या फटीतून डोकावून आपल्या व्याह्याकडे पाहिलं. आठ वर्षांच्या चिमुरड्या अहल्येने नशीब काढलं अंगणात खेळणाऱ्या अहल्येला आईने बोलावून घरात आणलं. आणि तशीच तिला हाताला धरून ती देवघराशी आली. 'बाळ, आधी खंडोबाच्या पाया पड...आज खंडोबाने आपली प्रार्थना ऐकली.' छोट्या अहल्येने खंडोबाला नमस्कार केला आणि ती खुदकन हसली!

पुरणपोळीचा झकास बेत झाला. मल्हाररावाने शिंदे-पाटलांकडे यथेच्छ पाहुणचार घेऊन निरोप घेतला.

'मल्हाररावजी, ही खंडोबाची कृपा. काय योगायोग बघा. आपण इकडे देवदर्शनाला आलात. आमची अहल्या आपल्या दृष्टीस पडावी आणि आपण तिला सूनबाई करून घ्यावी...!'

'पाटील बुवा, ह्या साऱ्या गोष्टी वरच ठरलेल्या असतात. आपण आपली उगीच बढाई मारायची! तुमच्या पोरीचं भाग्य मोठं, ती राजघराण्यात पडणार आणि आमचंही भाग्य थोर, की आम्हाला अशी गुणी सूनबाई मिळायची ती

पुढच्याच महिन्यात बोलणी करू या आणि लगेच कार्य उरकून टाकू या !'

रामराम करून मल्हाररावजी निघून गेले. शिंदे पाटलांच्या घरात आनंदी आनंद पसरला. माणकोजी शिंद्यांनी आपल्या लाडक्या लेकीला मायेने जवळ घेतलं. तिच्या पाठीवरून ममतेनें हात फिरवून ते म्हणाले, 'अहल्ये, पोरी नशीब काढलंस ! सुभेदाराची सून होणार तू !'

★

४

## अहल्या सासरी आली

लग्न झालं त्या वेळी अहल्या आठ वर्षांची चिमुरडी पोर होती ! खंडेरावही दहा वर्षांचा ! माणकोजी शिंद्यांच्या घरातील हे चिमुकलं झाकलं माणिक होळकरांच्या घराण्यात आलं. उंबरठ्यावरील माप ओलांडून ही छोटीशी सूनबाई होळकरांच्या घरात आली.

अहल्याबाईच्या, नशिबाने सासू-सासरे फारच चांगले मिळाले. आई-वडिलांसारखेच तिच्यावर मायेची अखंड बरसात करणारे. गौतमाबाईला ह्या आपल्या लाडक्या सूनेचं फार कौतुक. दररोज सकाळी उठून त्या दोघीजणी महादेवाच्या देवळात जात. अहल्येला माहेरीही पूजा-अर्चा, प्रार्थना, ह्यांचं चांगलं वळण लागलेलं. सकाळी उठून ती मागच्या बागेतील जाई-जुईची, गुलाबाची फुलं खुडून आणी, बेलाची त्रिदळं तोडून आणी. तुळशीची पानं तबकात ठेवून देई पूजेची तयारी करण्याची अहल्येला फार हौस. चांदीच्या तबकात, एकीकडे फुलं, बेल, तुळस, दुसरीकडे गंध,

कापूर, फुलवाती, उदबत्त्या सारं सारं व्यवस्थित मांडून ठेवायची. सहाणेवर गंध उगाळायला तर तिला फार आवडे. तिच्या माहेरचा लौकिकही फार चांगला. सकाळी, ती स्नान करून शिवलीलामृतातील ओव्या म्हणे. सासूला त्यावेळी फार फार आनंद होई. आपल्याला अशीच धार्मिक, देवधर्माची आवड असणारी सूनबाई मिळावी अशी गौतमाबाईची फार फार इच्छा होती.

कोवळी, आठ-नऊ वर्षांची पोर, स्नान करून लुगडं नेसता नेसता...' कैलासराणा शिवचंद्रमौळी...' सुरेल आवाजात म्हणू लागली, की गौतमाबाई अगदी कौतुकाने आपल्या सुनेकडे पाहू लागे ! देवा खंडोबा ! मला गुणाची सून दिलीस ! तुझी केवढी कृपा रे !

दोघी सासवा-सुना अशाच एका दिवशी महादेवाला चालल्या होत्या. देवळाच्या दाराशी एक आंधळा भिकारी पथारीवर बसला होता ! गौतमाबाई-अहल्या देवळाकडे चालल्या होत्या. इतक्यात अहल्येचं लक्ष त्या भिकाऱ्याच्या खाचा झालेल्या डोळ्यांकडे गेलं ! तिचं चिमुकलं हृदय कळवळलं ! अहल्या अतिशय दयाळू आणि कनवाळू. ती दबल्या आवाजात म्हणाली, 'सासूबाई, मी ह्या आंधळ्या भिकाऱ्याला थोडेसे तांदूळ देऊ का ?' सासुरवाशीण अहल्या जरा घाबरलीच. उगीच एवढ्या-वरूनच सासूबाई तणतणायच्या. फडाफडा बोलायच्या. सासरी जाताना आईने सांगितलेला उपदेश तिच्या कानात घोळू लागला. 'बाळ अहल्ये, सासू-सासऱ्यांच्या आज्ञेबाहेर जाऊ नकोस !'

आपण उगीचच विचारलं सासूबाईंना ! त्या चिडल्या, संतापल्या तर ? पण सासूही तिच्याच सारखी दयाळू आणि

वृत्तीने धार्मिक. ती झटकन म्हणाली, ' बाळ, घाल हो. विचारायचं ते कशाला ? सत्कृत्य करायच्या वेळी वडील माणसांचा सल्ला सुद्धा घेऊ नये बघ !'

अहल्येच्या डोळ्यांची कमळं फुलली. तिने चटकन आपल्या ओच्यातून दोन मुठी तांदूळ त्या भिकाऱ्याच्या समोरच्या फडक्या-वर टाकले ! लहानपणापासूनच अहल्येला देण्याची अतिशय आवड ! कुणाला काही दिलं, की तिचं चिमुकलं हृदय आनंदाने नुसतं उचंबळून येई. आई तिला भातुकलीच्या खेळासाठी शेंगदाणे गूळ देत असे. आजी चुरमुरे देई. एकदा अशीच बोळक्यातून गूळ, दाणे, चुरमुरे घेऊन अहल्या मैत्रिणीकडे भातुकलीचा खेळ खेळायला चालली होती. वत्सला, इंदू, तारा सगळ्या मैत्रिणी सुमतीकडे जमणार होत्या. छोटी अहल्या दुडूदुडू चालली होती. इतक्यात तिच्या समोर एक म्हातारी भिकारीण आली. डोक्यावर पिकल्या केसांचं छप्पर, चेहऱ्यावर असंख्य सुरकुत्यांचं जाळं, म्हातारीचे पाय अक्षरशः लटपटत होते. पोट भकाळी गेलं होतं. तिला पाहून अहल्येचं मन चरकलं. आनंदाने दुडदुडत जाणारी तिची पावलं एकदम तिथल्या तिथेच स्थिरावली. काय ह्या म्हातारीची अवस्था ! हिला किती दिवसांत खायला मिळालं नसेल. अरेच्या, हिला डोळ्यांनी नीट दिसतही नाही. अहल्येच्या छोट्याशा मेंदूत विचारांचा नुसता गुंता झाला. एकदम तिला काहीतरी नवा विचार सापडला. ती झटकन पुढे झाली आणि म्हणाली, ' आजीबाई, तुम्ही बसा इथे झाडाखाली. मी तुम्हाला देते खायला आणून.'

म्हातारी तशीच कडमडत, शेजारच्याच एका झाडाखाली बसली. अहल्येने आपल्या जवळचे शेंगदाणे, गूळ, चुरमुरे तिच्या

वाडग्यात घातले. म्हातारीच्या पोटात भुकेची आग पडली होती. अहल्येला वाटलं, म्हातारी किती दिवसांची भुकेली आहे ! ती तशीच घरी गेली. आणि आईला म्हणाली, 'आई ग, तिथे एक म्हातारी बाई आहे. बिचारी किती दिवसांची उपाशी आहे कुणास ठाऊक ! मी तिला माझे शेंगदाणे, गूळ, मुरमुरे दिले ! आता एक भाकरी देऊ का ?'

अहल्येचे कनवाळू हृदय पाहून आईला गहीवरून आलं. अहल्येला पोटाशी घेऊन ती म्हणाली, 'माझी गुणाची पोर ! हे घे तुला शेंगदाणे, गूळ, मुरमुरे. तू जा खेळायला भातुकली. मी त्या म्हातारीला जेवण देते नेऊन. अहल्येने पत्रावळीवर भात, भाकरी, भाजी वाढली आणि झाडाखालच्या त्या म्हाताऱ्या भिकारणीला नेऊन दिली. अहल्या मग शेंगदाणे, गूळ, मुरमुरे घेऊन भातुकली खेळायला गेली.

आता त्या भिकाऱ्याच्या फडक्यावर तांदुळाचे दाणे टाकताना अहल्येला त्या प्रसंगाची आठवण आली. ती विचार करू लागली. मजाच झाली. म्हणजे माझ्या सासूबाई आईच्याच सारख्या आहेत ! आईच्या स्वभावासारखी प्रेमळ सासू मिळणं म्हणजे केवढं भाग्य माझं !

★

५

## पती... देवाचं देणं

होळकरांच्या उंबरठ्यावरचं माप ओलांडून अहल्याने गृह-प्रवेश केला! स्वतःच्या कर्तृत्वावर, पराक्रमावर माळव्याची 'सुभेदारी' मिळविणारा सासरा... आणि धार्मिक, प्रेमळ, सासू ह्यांच्या माया-ममतेच्या छायेत अहल्याबाईचं व्यक्तिमत्व खुलून, निघत होतं.

संध्याकाळची वेळ होती. सासूबाईंच्या बरोबरच अहल्याबाई देवदर्शनाला जाऊन आली. अहल्याबाईने देवापुढे दिवा लावला. आणि हात जोडून ती खंडोबाची मनोभावे प्रार्थना करू लागली. इतक्यात कुणाचा तरी जोरात ओरडण्याचा आवाज आला. अहल्येच्या छातीत धस्स झालं. तिची पावलं लटपटली. तशीच ती पुढल्या दारी आली. पाहते तो काय, खंडेराव नशेत वाटेल ते बरळत होता. त्याचे डोळे तारवटलेले दिसत होते. पाय लटपटत होते...मल्हाररावाने त्याला धरून पकडून ठेवलं होतं! पतीची ती अवस्था पाहून अहल्येच्या पोटात धस्स झालं! तिचे डोळे

अश्रूंनी भरून आले. पण गौतमाबाई आणि मल्हाररावांकडे पाहून तिने आपले अश्रू पटकन पुसून टाकले. दुःख गिळून टाकलं.

'खंडू, अरे कुणी तुला हा घुटीचा नाद लावला ! माझ्या पोराचं ह्या घुटीनं वाटोळं होणार !' गौतमाबाईने जोराने टाहो फोडला.

'बेटा, वाईट पोरांच्या संगतीत शिरू नकोस. सडक्या आंब्या-बरोबर चांगला आंबाही सडून कुजूनजातो.'

नशेत झिंगलेल्या खंडेरावाला कशाचंच भान नव्हतं. त्याचं बरळणं चालूच होतं. शेवटी मल्हाररावाने त्याला बिछान्यावर झोपविलं. आपल्या संसारसुखाला कुणाची नजर लागली ? अहल्या पदराला डोळे पुसू लागली. रात्रभर तिच्या डोळ्याला डोळा लागला नाही. एकसारखा तिच्या डोळ्यांना खंडेराव दिसत होता ! आपल्या नशिबात पतिसुख नाही असं तिच्या मनाने घेतलं.

पुढे पुढे तर आपल्या पतीचे अनेक दुर्गुण अहल्येला दिसू लागले. त्याला घुटीचे जबरदस्त व्यसन ! श्रीमंताचा पोर, वाईट संगत ! मग बिघडण्याला वेळ तो किती लागणार ? पतीच्या अशा व्यसनांचे विचार अहल्येच्या डोक्यात आले, की ती अगदी बेचैन होऊन जाई. तिच्या छातीत धडधड लागे आणि डोळ्यांत अश्रू जमा होत. एकदा अहल्येच्या मनात आलं आईला चिठ्ठी लिहावी. आई ग, इकडे घुटीचं फारच व्यसन लागलं आहे तिने अर्धं पत्र लिहिलं. पण पुन्हा तिच्या मनात आले. 'छे ! आईच्या डोक्याला कशाला काळजी द्या ! मुलगी एकदा सासरी गेली, की तिच्याबद्दल आई-बापांनी पुन्हा कशाला चिंता करावी. मुलीने आपलं दुःख आपल्याच मनात दाबून दडपून ठेवलं पाहिजे. आता

आईजवळ रडत रडत जायला आपण का लहान आहोत ?'

अहल्येने चिठ्ठी फाडून टाकली ! थोडा वेळ तशीच विचार करीत बसली. इतक्यात मल्हारराव तिथे आले सूनबाई कुठल्या-तरी गाढ चिंतेत रुतून गेलेली दिसतेय. तिच्या तेजस्वी डोळ्यांत चिंतेची काळोखी पसरलेली दिसत आहे. गालांवर अश्रूंचे ओघळ दिसत आहेत. मल्हारराव सूनबाईला म्हणाले, 'बेटा, काळजी करू नकोस ! गेले दोन-चार महिने, मी सारं सारं पाहतो आहे. खंडेरावाचं घुटीचं व्यसन दिवसेंदिवस वाढतच आहे. तो सारखा नशेतच असतो. पण सूनबाई, मी तरी काय करू ? किती शिकवलं, किती समजावून सांगितलं पण काही उपयोग नाही ! तुझ्यासारखी गुणी बायको मिळाल्यावर माझा खंडू सुधारेल ! काही चिंता करू नकोस. मी पहाडासारखा तुझ्यामागे उभा आहे.'

'मामंजी, म्हणून तर मी अशी उभी आहे. खंडोबाच्या कृपेने मला देवासारखे सासू-सासरे मिळाले त्यातच मी समाधानी आहे. नाहीतर माझ्या जीवनाचा वणवाच झाला असता !'

'सूनबाई, बाजीराव पेशव्यांचे गुरू, ब्रह्मेंद्र स्वामी यांच्यावर आम्हा नवरा-बायकोंची अपार भक्ती आहे. आमच्या उदाबाई, सीताबाई पण मोठ्या देवभक्त आहेत !'

अहल्याबाई मामंजीचं बोलणं मन लावून ऐकत होती. इतक्यात गौतमाबाई तिथे आल्या व म्हणाल्या, 'सूनबाई, पुराणिक आले आहेत. उद्या एकादशी आहे. उद्यापासून भागवताचा सप्ताह करू या ! शेजारच्या बायकाही येतील. सरदार साहेबांच्या वहिनींनाही सांगू या ! किती दिवस मला एकनाथी भागवत ऐकण्याची इच्छा आहे !'

'सासूबाई, उठतेच मी आता ! शेंगदाणे भाजून घेते.

आईजवळ रडत रडत जायला आपण का लहान आहोत ?'

अहल्येने चिठ्ठी फाडून टाकली ! थोडा वेळ तशीच विचार करीत बसली. इतक्यात मल्हारराव तिथे आले सूनबाई कुठल्या-तरी गाढ चिंतेत रुतून गेलेली दिसतेय. तिच्या तेजस्वी डोळ्यांत चिंतेची काळोखी पसरलेली दिसत आहे. गालांवर अश्रूंचे ओघळ दिसत आहेत. मल्हारराव सूनबाईला म्हणाले, 'बेटा, काळजी करू नकोस ! गेले दोन-चार महिने, मी सारं सारं पाहतो आहे. खंडेरावाचं घुटीचं व्यसन दिवसेंदिवस वाढतच आहे. तो सारखा नशेतच असतो. पण सूनबाई, मी तरी काय करू ? किती शिकवलं, किती समजावून सांगितलं पण काही उपयोग नाही ! तुझ्यासारखी गुणी बायको मिळाल्यावर माझा खंडू सुधारेल ! काही चिंता करू नकोस. मी पहाडासारखा तुझ्यामागे उभा आहे.'

'मामंजी, म्हणून तर मी अशी उभी आहे. खंडोबाच्या कृपेने मला देवासारखे सासू-सासरे मिळाले त्यातच मी समाधानी आहे. नाहीतर माझ्या जीवनाचा वणवाच झाला असता !'

'सूनबाई, बाजीराव पेशव्यांचे गुरू, ब्रह्मेंद्र स्वामी यांच्यावर आम्हा नवरा-बायकोंची अपार भक्ती आहे. आमच्या उदाबाई, सीताबाई पण मोठ्या देवभक्त आहेत !'

अहल्याबाई मामंजीचं बोलणं मन लावून ऐकत होती. इतक्यात गौतमाबाई तिथे आल्या व म्हणाल्या, 'सूनबाई, पुराणिक आले आहेत. उद्या एकादशी आहे. उद्यापासून भागवताचा सप्ताह करू या ! शेजारच्या बायकाही येतील. सरदार साहेबांच्या वहिनींनाही सांगू या ! किती दिवस मला एकनाथ भागवत ऐकण्याची इच्छा आहे !'

'सासूबाई, उठतेच मी आता ! शेंगदाणे भाजून घेते.

राजगिऱ्याच्या लाह्या फोडून घेते. उद्या आपणा सर्वांना एकादशी !' बोलता बोलता अहल्या उठलीच.

'सूनबाई, मी उद्या निर्जला एकादशी करणार आहे. खंडेरावा-साठी मी बोलले होते.'

अहल्येने पदराने डोळे पुसले व ती ताडकन् स्वयंपाक घराकडे वळली. आपले अश्रू तिला सासूबाईंना दाखवायचे नव्हते.

सासवा-सुना दोघीजणी पुराणश्रवण, उपासतापास, तीर्थयात्रा, व्रतवैकल्य, दानधर्म करीत. अहल्येस बालबोध वाचन, मोडीवाचन येऊ लागलं होतं ! खंडेराव आई-वडिलांच्या अपार मायेमुळे थोडासा लाडावला होता. त्याचा स्वभावही स्वच्छंदी होता. त्याला शिकारीचा नाद होता. पण घुटीच्या व्यसनाने त्याचं जीवन पार कोलमडून गेलं होतं ! तो नेहमी घुटीच्याच नशेत असायचा ! अहल्येने कधी आपल्या पतीची उपेक्षा केली नाही. अपमान, पाणउतारा केला नाही. भोळी-भाबडी अहल्या मनात म्हणे, पती हे देवाचं देणं, नशिबाचं लेणं ! पदरी पडलं नि पवित्र झालं ! तिच्या अनेक मैत्रिणी तिला खंडेरावाची कानउघाडणी करण्यास सांगत. पण अहल्येनं तसं कधीच केलं नाही ! अहल्याबाईस पतिसुख फारसं मिळालंच नाही. पतिसुख, संसारसुख तिच्या भाग्यात लिहिलेलं नव्हतं. स्वतःचा चिमुकला संसार करण्यापेक्षा प्रजेचा, गोरगरीबांचा संसार करण्यासाठीच तिचा जन्म झाला होता.

खंडेरावावर अहल्येचा नैतिक दाब होता. धार्मिक, सात्त्विक वृत्तीची अहल्या सहवासात असली, म्हणजे तेवढ्यापुरता खंडेराव नीट वागत असे. भांग पीत नसे, की अभक्ष्य भक्षण करीत नसे ! आपल्या पत्नीबद्दल त्याला एक प्रकारचा आदर-धाक वाटत असे.

खंडेराव तसा घरबशा, भित्रा नव्हता. खूप वेळा तो मल्हार-रावाबरोबर स्वारी-शिकाऱ्यांना जाई ! त्यामुळे एक प्रकारचा धाडसीपणा, शूरपणा त्याच्या अंगी आला होता. कित्येकदा सासवा-सुनाही मल्हाररावाबरोबर लढाईची मौज पहाण्यास जात. सासरा असा शूर वीर, की त्याच्या घोडदौडीची चाहूल लागताच शत्रू ' मल्हार आया! ' असं म्हणून धूम ठोकीत

' वीर ही वीरकी कद्र करता है ! ' ह्या नियमास अनुसरून एखाद्या वीराचा पराक्रम मल्हाररावाच्या नजरेत भरला, की मल्हारराव खूष होऊन हुकूम सोडे, 'अरे, बघता काय ! त्याचे खिसे पैशाने भरून टाका ! ' रणांगणावर शौर्याने तळपणाऱ्या वीरांचा मल्हारराव असा आदरसत्कार करीत असे ! त्यांना अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचे ! अहल्येचा सासरा हा असा सिंहासारखा शूर, पराक्रमी आणि कर्णासारखा उदार होता. तिला आपल्या सासू-सासऱ्यांचा विशेषतः सासऱ्यांचा फार अभिमान वाटे. आपला पती फारसा पराक्रमी, कर्तुत्ववान नाही ह्याची अहल्येला जाणीव होती. आणि म्हणूनच काय आपल्या कर्तुत्ववान, कर्तबगार सासऱ्याची मर्जी राखण्यात, त्यांचं वाढतं वैभव बघण्यात तिला एक प्रकारची धन्यता वाटायची. खंडेरावाची पत्नी यापेक्षा सुभेदाराची सून म्हणवून घेण्यातच तिला अभिमान वाटू लागला.

★

६

## पतीचे छत्र उडून गेले !

दिवस चालले होते. खंडेरावाचं घुटीचं व्यसन दिवसेंदिवस वाढतच चाललं होतं... त्याबरोबरच अहल्येची देवाधर्माविरची भक्तीही वाढत चालली होती. थोडयाशा निराशामय संसारात आशेचा किरण चमकला. छोटी सानुली पावलं दुडूदुडू धावणार, बोबडे बोबडे बोल ऐकायला मिळणार म्हणून अहल्येचं मन आनंदाने भरून आलं. अपत्य लाभ हे परमेश्वरी वरदानच आहे. पतीचं संसारात लक्ष नाही, घुटीची नशा, निराशा, ह्या साऱ्या अंधारात तिला कुठेतरी सुखाचा दिवा दिसू लागला. देपाळपूरच्या मुक्कामात इ. सन. १७४५ साली अहल्येला पुत्रलाभ झाला. त्यानंतर तीन वर्षांनी मुलगी झाली. मुलाचं नाव मालेराव आणि मुलीचं नाव मुक्ताबाई ठेवण्यात आलं.

ह्या मुलांचं पालनपोषण करण्यात अहल्येचा काळ मोठ्या सुखाने चालला होता.

मल्हाररावाचा तर आपल्या लाडक्या सुनेवर फारच लोभ होता ! माझा बेटा कर्तृत्ववान नाही पण माझी सून कर्तबगार आहे ह्या गोष्टीचा त्याला विलक्षण अभिमान वाटे ! 'सूनबाई, साऱ्याची व्यवस्था तूच करून टाक ! सूनबाई, सगळ्यांचा तनखा देऊन टाक. पेशव्यांना काही गोष्टी कळवून टाक.' इत्यादी कामे मल्हारराव अहल्याबाईवरच सोपवी.

कित्येक वेळा स्वारीवर निघताना तो अहल्याबाईलाही घेऊन जाई ! शिपायांची घोडदौड पाहताना अहल्या अगदी तल्लीन होऊन जाई.

'माझी सून म्हणजे गुणाची पोर आहे. तिला कशाची घमेंड नाही, तोरा नाही. कोणतंही लहान-मोठं काम ती अगदी प्रसन्न-मुखाने करते. माझी सून खरंच मोठी तडफदार आहे !'

सुनेच्या कर्तृत्वाकडे पाहून मल्हारराव मुलाच्या व्यसनीपणाकडे, स्वच्छंदीपणाकडे डोळेझाक करी.

दिवस चालले होते. १७५४ साल सुरू झालं. मुलाला आणि सुनेला बरोबर घेऊन मल्हारराव राघोबादादाबरोबर स्वारीवर गेला. राघोबादादाने सुरजमल जाटाकडे एक कोट रुपये खंडणी मागितली होती. जाट एवढे पैसे कोठून आणणार ? एक दिवस जाटाचा वकील रूपराम कटारी ह्याने राघोबादादाची भेट घेतली. गयावया करून तो राघोबादादाला सांगू लागला, 'महाराज, चाळीस लाखांत सारा व्यवहार मिटवून टाका.' पण राघोबादादाने त्याची मागणी फेटाळून लावली. जाट सुद्धा हट्टाला पेटला. त्याने लढाईचं आव्हान दिलं.

राघोबादादा, मल्हारराव होळकर आणि जयाप

जाटांच्या मुलखात आले व त्यांनी सुरजमल जाटावर स्वारी केली. जाटही फौजेनिशी तयार होताच. महिना-दीड महिना झाला तरी जाटांच्या कुंभेरीचा किल्ला सर होईना. चकमकी सारख्या चालू होत्या. मराठ्यांच्या सुरंगांचा प्रयत्नच चालेना. युद्ध चालूच होतं. एक दिवस खंडेराव जेवण करून बाहेर उभा असताना त्याच्यावर एक गोळा येऊन पडला व तो जागच्या जागीच ठार झाला. अहल्याबाईचा सौभाग्यरवी अस्ताला गेला.

आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या मृत्यूची बातमी ऐकून मल्हाररावांवर तर आकाशच कोसळलं. खंडोबाची आई आणि अहल्याबाई तर धाय मोकलून रडू लागल्या.

‘देवा, खंडोबा ! अरे काय रे करू मी आता ! मी पोरका झालो. म्हाताऱ्याची काठी गेली. अहल्ये, पोरी कसं होणार आता तुझं ?’ मल्हाररावाला शोक आवरता येईना. राघोबादादाने, इतर सरदारांनी त्याला चार गोष्टी समजावून सांगितल्या.

‘मल्हारराव ! जन्म-मरणाच्या गोष्टी आपल्या का हातात आहेत ? परमेश्वराची लीला अगाध आहे. तुम्ही असे वीर बहाद्दर, रणांगणात मर्दुमकी गाजवणारे, तुम्हाला असे शोक विव्हल पाहून, तुमच्या डोळ्यांत असे अश्रू पाहून आम्हीच थिजून गेलो आहोत ! मल्हारजी, शोक आवरा हिम्मत धरा.’

क्षणभर मल्हारजींचा उसळलेला शोकावेग थोडासा शांत झाला. मोर्च्यातून खंडेरावाचं शव आणलं ! बिचारी अहल्या सारं दुःख पोटात ठेवून ओघळणारे अश्रू पुसून पतीच्या शवापाशी आली. पतिमुखाचं दर्शन घेऊन त्या ज्वाळांतच आपला देह फेकून द्यावा. पतीच्या बरोबर सती जावं अशी प्रतिज्ञा तिने केली.

‘मामंजी, पदर पसरते ! आता अहल्येलाही विसरून जा,

मल्हाररावाचा तर आपल्या लाडक्या सुनेवर फारच लोभ होता ! माझा बेटा कर्तृत्ववान नाही पण माझी सून कर्तबगार आहे ह्या गोष्टीचा त्याला विलक्षण अभिमान वाटे ! 'सूनबाई, साऱ्याची व्यवस्था तूच करून टाक ! सूनबाई, सगळ्यांचा तनखा देऊन टाक. पेशव्यांना काही गोष्टी कळवून टाक.' इत्यादी कामे मल्हारराव अहल्याबाईवरच सोपवी.

कित्येक वेळा स्वारीवर निघताना तो अहल्याबाईलाही घेऊन जाई ! शिपायांची घोडदौड पाहताना अहल्या अगदी तल्लीन होऊन जाई.

'माझी सून म्हणजे गुणाची पोर आहे. तिला कशाची घमेंड नाही, तोरा नाही. कोणतंही लहान-मोठं काम ती अगदी प्रसन्न-मुखाने करते. माझी सून खरंच मोठी तडफदार आहे !'

सुनेच्या कर्तृत्वाकडे पाहून मल्हारराव मुलाच्या व्यसनीपणाकडे, स्वच्छंदीपणाकडे डोळेझाक करी.

दिवस चालले होते. १७५४ साल सुरू झालं. मुलाला आणि सुनेला बरोबर घेऊन मल्हारराव राघोबादादाबरोबर स्वारीवर गेला. राघोबादादाने सुरजमल जाटाकडे एक कोट रुपये खंडणी मागितली होती. जाट एवढे पैसे कोठून आणणार ? एक दिवस जाटाचा वकील रूपराम कटारी ह्याने राघोबादादाची भेट घेतली. गयावया करून तो राघोबादादाला सांगू लागला, 'महाराज, चाळीस लाखांत सारा व्यवहार मिटवून टाका.' पण राघोबादादाने त्याची मागणी फेटाळून लावली. जाट सुद्धा हट्टाला पेटला. त्याने लढाईचं आव्हान दिलं.

राघोबादादा, मल्हारराव होळकर आणि जयाप

जाटांच्या मुलखात आले व त्यांनी सुरजमल जाटावर स्वारी केली. जाटही फौजेनिशी तयार होताच. महिना-दीड महिना झाला तरी जाटांच्या कुंभेरीचा किल्ला सर होईना. चकमकी सारख्या चालू होत्या. मराठ्यांच्या सुरंगांचा प्रयत्नच चालेना. युद्ध चालूच होतं. एक दिवस खंडेराव जेवण करून बाहेर उभा असताना त्याच्यावर एक गोळा येऊन पडला व तो जागच्या जागीच ठार झाला. अहल्याबाईचा सौभाग्यरवी अस्ताला गेला.

आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या मृत्यूची बातमी ऐकून मल्हाररावांवर तर आकाशच कोसळलं. खंडोबाची आई आणि अहल्याबाई तर धाय मोकलून रडू लागल्या.

'देवा, खंडोबा ! अरे काय रे करू मी आता ! मी पोरका झालो. म्हाताऱ्याची काठी गेली. अहल्ये, पोरी कसं होणार आता तुझं ?' मल्हाररावाला शोक आवरता येईना. राघोबादादाने, इतर सरदारांनी त्याला चार गोष्टी समजावून सांगितल्या.

'मल्हारराव ! जन्म-मरणाच्या गोष्टी आपल्या का हातात आहेत ? परमेश्वराची लीला अगाध आहे. तुम्ही असे वीर बहाद्दर, रणांगणात मर्दुमकी गाजवणारे, तुम्हाला असे शोक विव्हल पाहून, तुमच्या डोळ्यांत असे अश्रू पाहून आम्हीच थिजून गेलो आहोत ! मल्हारजी, शोक आवरा हिम्मत धरा.'

क्षणभर मल्हारजींचा उसळलेला शोकावेग थोडासा शांत झाला. मोर्च्यातून खंडेरावाचं शव आणलं ! बिचारी अहल्या सारं दुःख पोटात ठेवून ओघळणारे अश्रू पुसून पतीच्या शवापाशी आली. पतिमुखाचं दर्शन घेऊन त्या ज्वाळांतच आपला देह फेकून द्यावा. पतीच्या बरोबर सती जावं अशी प्रतिज्ञा तिने केली.

'मामंजी, पदर पसरते ! आता अहल्येलाही विसरून जा,

माझ्या मालकांबरोबर मी पण जाते ! आपण परवानगी देणार ना ?'

मल्हाररावाला वाटलं, आपल्या पायांखालची धरणीच गदगदा हलत आहे ! शत्रूंचा कर्दनकाळ, बहाद्दर सुभेदार मल्हारराव एखाद्या लहान पोरासारखा टाहो फोडून जोरजोराने रडू लागली 'बाई अहल्ये, मला उन्हाळा करत्येस की काय ? तूही आता सती जाऊन आम्हास चहूकडून उघडी करतेस काय ? तू राहिलीस की आम्ही समजू, अहल्या गेली आणि खंडू आहे ! तुला माझा मुलगा समजूनच मी माझी सारी दौलत सांभाळण्याचं काम तुझ्याकडून करून घेत होतो अहल्ये, मी स्वतः फक्त उत्पन्नाचीच काय ती काळजी वाहत होतो. आता माझं हे भाग्य कायम ठेवणं तुझ्याच हाती आहे. बाळे, ह्या म्हाताऱ्याची तुला कीव येऊ दे !'

वृद्ध सासऱ्याचे हे निर्वाणीचे शब्द ऐकून अहल्याबाईने सती जाण्याचा आपला हेका सोडला.

आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या मरणास सुरजमल जाट हाच कारण झाला हे पाहून मल्हाररावास अत्यंत त्वेष आला. त्याने स्मशानातच भीष्मप्रतिज्ञा केली. 'सुरजमलाचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरच खरा मल्हारराव ! नाही तर मी प्राणत्याग करीन.'

ही बातमी सुरजमलास कळली तेव्हा त्याच्या काळजाने ठावच सोडला.

मथुरेत खंडेरावाचं यथाविधी दहन झाले. तेरा दिवस उत्तर-कार्य होऊन चांगला दानधर्मही झाला. राघोबाने खंडेरावाच्या उत्तरक्रियेसाठी दहा हजार रुपये मंजूर केले. कुंभेरील

रावाची छत्री बांधण्यात आली. त्या छत्रीच्या खर्चासाठी जाटांच्याच मुलखातून पाच गावं घेऊन व्यवस्था करण्यात आली. मल्हार-रावाच्या प्रतिज्ञेने जाट घाबरा झाला होता. जयाजी शिंद्याने मध्यस्थी करून समझोता करून दिला.

शोकमग्न अहल्या विचार करू लागली, पित्यापेक्षाही जास्त प्रेम करणारे आपले मामंजी ! दौलतीचा सांभाळ करायला हवा. प्रजेचं हित पाहिलं पाहिजे ! बिचारीने आपले अश्रू पुसून टाकले आणि आपलं कर्तव्य करण्यास ती दक्ष झाली.

खंडेराव गेला त्यावेळी मुलगा मालेराव दहा वर्षांचा. सासरा लढाईवर मर्दुमकी गाजवीत होता. घरचा सारा कारभार अहल्ये-लाच पाहावा लागे.

पानिपतचे घनघोर युद्ध झाले. मल्हारराव, महादजी शिंदे मोठ्या फौजा घेऊन भाऊसाहेबांबरोबर गेले होते दुर्दैवाने ह्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. मल्हारराव माघारी आला. वृद्धावस्थेतही त्याने राघोबाबरोबर अनेक मोहिमांत भाग घेतला.

'माझी कर्तबगार सून, घरची दौलतीची सारी कामं चोख बघेल.' मल्हारराव सर्वांना मोठ्या आत्मविश्वासाने सांगत असे.

पति निधनाचं दुःख अहल्याबाईने पचवून टाकलं आणि ती प्रजेच्या हितकार्यात मग्न झाली.

पानिपताहून जीव घेऊन अनेक शिपाई माघारी फिरले. अहल्याबाईने त्यांची मोठ्या मायेने वास्तपुस्त केली. मल्हार-रावाला रजपूत, जाट, मोंगल इत्यादींशी मुकाबला करण्यासाठी एकसारख्या लढाया, चढाया कराव्या लागत. कित्येक महिने तो घराच्या बाहेरच असे !

प्रथम प्रथम अहल्येला बुजल्यासारखं झालं ! पण ती खरी

कर्तबगार बाई. घरची कामं, वसुली, फौजेची व्यवस्था, शत्रूच्या हालचाली, राजकारण इत्यादी अनेक गोष्टींबद्दल मल्हारराव आपल्या सुनेला विश्वासाने लिहीत असे.

अहल्या प्रथमपासूनच धार्मिक वृत्तीची! सकाळी स्नान करून, धूतवस्त्रे परिधान करून ती देवापुढे पोथी वाचीत बसली होती. इतक्यात एक सेवक मल्हाररावांची चिठ्ठी घेऊन आला. अहल्येने पोथी बांधली व ती सासऱ्याचं पत्र वाचू लागली.

'चिरंजीव अहल्याबाईस प्रति मल्हारजी होळकर आशीर्वाद– तुम्ही पत्र पाठविलें ते पावलें. रा. चिमणाजी गोविंद मामलेदार यांस बैलाच्या चाऱ्यानिशी व तोफखानी याच्या डागडुजीकरिता ताकीद देऊन तोफांची झाडून तयारी करवून ठेवणे. असावधपणा नसावा. तिकडे आल्यावर तोफांचे प्रयोजन लागेल. यास्तव दोर-दोरखंड, कळकाव, वगैरे सर्व सांभाळून सिद्धता करून ठेवावी. बैल ताजेतरारव करून ठेवणे.'

अहल्येने पत्र वाचलं आणि कारभाऱ्यांना बोलावून त्याप्रमाणे सूचना केल्या.

पानिपतच्या लढाईनंतर सात-आठ महिन्यांनीच मल्हाररावांची प्रिय पत्नी गौतमाबाई मरण पावली. त्यामुळे सुनेशिवाय मल्हार-जींना मायेचे, आधाराचं दुसरं कोणीच नव्हतं.

हळूहळू अहल्याबाई मल्हाररावाच्या तालमीत तयार झाली. सासऱ्याच्या मायेचा आणि मार्गदर्शनाचा अहल्येला आपल्या भावी आयुष्यात केवढा उपयोग झाला! सासऱ्याच्या मायेचं छत्र तिच्यावर होतं म्हणून तर ती साऱ्या संकटांना तोंड देऊ शकत होती.

मल्हारराव आता वृद्ध झाला होता. सत्तरी ओलांडून

होती. शरीर थकलं होतं. पण तरी त्या थकल्याभागल्या शरीरातील लढण्याची जिद्द कमी झाली नव्हती. राघोबादादाबरोबर तो उत्तरेच्या राजकारणात नि लढायांत भाग घेत असे. कर्तबगार सून असल्यामुळे त्याला घरची काळजी नव्हती.

थोड्याच दिवसांनी मल्हाररावाची प्रकृती अचानक बिघडली. कानास जोराचा ठणका लागला होता ! अहल्येच्या छातीत धस्स झालं ! ती सासऱ्यांची मनोभावे शुश्रूषा करू लागली. इकडे डोळ्यांतून अश्रूधारा वाहत होत्या. पण इकडे औषधपाणी करणंही चालू होतं आपली अंतकाळची वेळ जवळ आली आहे हे मल्हाररावांनी ताबडतोब ओळखलं. त्यांनी दादासाहेब, महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरे मंडळींना बोलावलं. क्षीण आवाजात मल्हारराव बोलू लागले, अहल्याबाई जीवाचा कान करून मामंजीचे शब्द ऐकू लागली. 'दादासाहेब, मी तर चाललो, या वेळी माझा खंडू असता तर किती बरं झालं असतं ! परमेश्वराची इच्छा. आता हा मालू, माझा नातू हा खंडूच समजून आपल्या पदरात घालतो सरकार, हा देह आपल्याच अन्नावर पोसला आहे. आपणच त्याचे धनी आहात. आपणाखेरीज आम्हास दुसरं कोण आहे ?'

मल्हाररावाने मालेरावाचा हात राघोबादादाच्या हातात दिला आणि प्राण सोडला. तो दिवस एकादशीचा होता. राघोबादादा तर हंबरडाच फोडू लागले. ते शोकाने वेडे झाले. 'देवा, आज माझा पाठीराखा गेला. आज माझा सर्व आधार तुटला !'

अहल्या तर गुराप्रमाणे हंबरडा फोडू लागली ! मल्हारराव तिच्या जीवनाचा दीपस्तंभ ! तोच आज ढासळला पती

गेल्यावर बिचारीने आपल्या ममताळू सासऱ्याकडे पाहून शोक आवरला.

'खंडोबा ! मी आता कुणाकडे पाहू रे ! सासऱ्यांच्या कृपा-छत्रात मी सुखाने जगत होते. आज तेच छत्र उडाले. पतीसाठी केला नाही इतका आकांत अहल्येने आपल्या सासऱ्यांसाठी केला. तिचं जीवन अंधारून गेलं. 'सूनबाई' म्हणून प्रेमाने मायेने हाक मारणारं माणूस निघून गेलं.

मल्हारी मार्तंडाचं नाव घेत सुभेदार मल्हारराव होळकर देवाघरी निघून गेले. राघोबादादा, महादजी शिंदे क्रियाकर्मास उपस्थित होते. दहावे दिवशी कावळा पिंडाला शिवेना 'मल्हारजी आम्ही सूनबाई, नातवाची काळजी घेऊ, दौलतीचा सांभाळ करू.' तुकोजी वचन देत होता तरी कावळा शिवेना.

'मल्हारदादा जाटांचे पारिपत्य करीनच !' तुकोजीचे वाक्य पूर्ण होण्याआधीच काकस्पर्श झाला. खंडेरावाला, एकुलत्या एक मुलाला मारणाऱ्या जाटांचा बदला घ्यायचा होता ! तुकोजीने शेवटी उदक सोडले. तेव्हा तो आत्मा शांत झाला. सुभेदार मल्हाररावांच्या दहनस्थळी अलमपुरी छत्री बांधण्यात आली.

इंदूर संस्थानचा हा मूळपुरुष. अटकेवर झेंडा लावण्याच्या कामगिरीत त्यांचा मोठा वाटा होता. अशा ह्या शूर, स्वामिभक्त ममताळू सासऱ्याचा आदर्श पुढे ठेवून राज्यकारभार करायचा असा अहल्येने निश्चय केला.

★

७

## कर्तव्याच्या मार्गावर !

मल्हारराव गेले आणि अहल्येचं जीवन अंधारून गेलं ! ती इंदुरातच होती. सारं इंदूर शोकविव्हळ होऊन गेलं होतं. तास् न् तास अहल्याबाई विचारात डुबून जाई. ' अहल्ये ' आता डोळे पूस आणि आपल्या कामाला लाग ! अहल्येने मागे वळून पाहिले तो हरकूबाई ! नात्यातीलच होती ती. सासूसारखी.

' हरकूताई, पहाडासारखे माझे मामंजी गेले आणि मला निराधार, पोरकं वाटू लागलं ! '

' बाळ, मल्हारी तुला म्हणायचा ना, हा माझा बेटा आहे. सून नाही. तेव्हा आता मुळूमुळू रडू नकोस. मल्हारी गेला आणि मल्हारीचा बेटा राहिला आहे असंच मी समजते.'

अहल्येची नणंद उदाबाई वाघमारे हिने सुद्धा तिला वारंवार धीर दिला. भारमालदादा नावाचा एक कारभारी होता. तो होळकरांची इमाने इतबारे सेवा करीत होता. अहल्याबाईला त्याचा मोठा आधार होता.

अहल्याबाईची मुलगी मुक्ताबाई आपल्या सासरी सुखाने नांदत होती. तिच्या मनावर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले होते. ती अहल्याबाईसारखीच प्रेमळ, समजूतदार, आणि धार्मिक वृत्तीची होती. तिचे यजमान यशवंतराव फणसे फौजबंद सरदार होते. आपली मुलगी चांगल्या घरी पडली. त्यामुळे अहल्या-बाईची ती एक चिंता मिटली होती.

मल्हाररावाने स्वतःच्या कर्तबगारीवर पेशव्यांकडून इंदूर संस्थानची जहागिरी मिळविली होती. ७४ लाख रुपये वार्षिक उत्पन्नाचा मुलूख आणि १६ लाख रुपयांची रोकड त्याने मागे ठेविली होती. अहल्याबाईने साऱ्या उत्पन्नाची नीट तपासणी केली. दौलतीचा वारसा मल्हाररावाच्या नातवाकडे म्हणजे अहल्येच्या एकुलत्या एक मुलाकडे येणार होता. पण इथेही अहल्येचे दुर्दैवच आड आले. मालेराव तसा कोरडाच होता. आजोबांचा पराक्रम, कर्तबगारी त्याचेजवळ नव्हती, की अहल्येची सात्विकता, धार्मिक वृत्ती, तडफही त्याला माहीत नव्हती.

मल्हारराव मालेरावाला नेहमी आपल्या बरोबर घेई. खंडेरावाने त्याची निराशा केली होती. नातवाने तरी शिकावं, म्हणून आजोबा फार काळजी घेत. पण नातवाचं लक्ष दुसरी-कडेच. आजोबांच्या तालमीत तयार होण्याची त्याची इच्छाच नव्हती. आता तो चांगला वीस-एकवीस वर्षांचा झाला होता. पण प्रौढपणा कसा तो त्याला माहीतच नव्हता. आजोबांचा धाक, दरारा संपल्यावर तर तो जास्तच स्वच्छंदी, अवखळ झाला होता. चित्ते, वाघ, अस्वले इत्यादी जनावरं बाळगण्याचा त्याला फार षोक होता. हत्तीची साठमारी पाहण्यात त्याला फार मौज वाटे. त्याची बुद्धी फार चंचल होती. इतकंच नव्हे तर तो काहीसा

व्यसनाधीन आणि विलासीसुद्धा होता. आजोबांनी स्वकर्तत्वावर मिळविलेली एवढी अफाट संपत्ती हा पोरगा उडवून तर लावणार नाही ना ? वाईट मित्रांच्या संगतीने तो साऱ्या घराण्याचा नाश तर नाही ना करून टाकणार ? ह्या काळजीनेच अहल्याबाई जास्त खंगून गेली ! काय करावं तिला काहीच सुचेना. मल्हार-रावाच्या मृत्यूनंतर सोळाव्या दिवशी अहल्येने त्याला एक उपदेशपर पत्र पाठविलं.

'चिरंजीव मालोजीरावबाबास आशीर्वाद, तुमचेकडून बरेच दिवसात चिठ्ठी नाही. म्हणून काळजी वाटत आहे. खुशालीचे तपशीलवार पत्र पाठवीत जावे. मूढता धारण करू नये. आजोबांच्या निधनाचे दु:ख विसरून जावे. मन शांत ठेवावे. हळहळ करीत बसू नये. कारभाराकडे लक्ष वळवावे. नेहमी मन कामात गुंतेल असे वागावे. रिकामे मन शत्रू तेव्हाच पकडून घेतो. त्यावर हल्ला करते. आळशी मनात कुविचार निर्माण होतात. आजोबांची कीर्ती आठवावी, कर्तत्व दाखवावे. पराक्रम दाखवावा. गंगाधर-तात्यांच्या सल्ल्याने वागत असावे !'

आई अशारीतीने आपल्या लाडक्या लेकाला मार्गदर्शन करीत असे ! आज ना उद्या आपलं तरुण पोर नीट वागेल, कारभार करील, पराक्रम गाजवील, होळकरांचं नाव चहूकडे करील. आपल्याला सुख देईल. अशी वेडी आशा तिला वाटत होती. पण अहल्याबाईंच्या नशिबात जसं पतिसुख नव्हतं. तसंच पुत्रसुखही नव्हतं. ती नेहमी आपल्या नणंदेजवळ म्हणे, 'वन्स, माझ्या नशिबी संसारसुखच नाही ! इकडून काही करणं झालं नाही. पोरगाही तोच कित्ता गिरवणार असं दिसतंय.' बोलता बोलता अहल्येचे डोळे भरून येत ! पतीच्या स्वच्छंदी वागण्याने तिला

धसकाच बसला होता. त्यावेळी मायेचा हात फिरवणारा, धडाडीचा सासरा होता. पण आता पोराने बापाचाच कित्ता गिरवला तर? अहल्येच्या नशिबात पतिसुख नव्हतं, तसंच पुत्रसुखही नव्हतं! कौटुंबिक सुख तिच्या नशिबातच नव्हतं! पुत्र चांगला सासऱ्यासारखा कर्तबगार निघाला असता तर अहल्याबाईने त्याच्याकडे बघून तरी सुखाने दिवस कंठले असते! पण छे! अहल्याबाईचा सारा संसारच असार झाला होता. आघातांमागून आघात, आणि धक्क्यांमागून धक्के बसत होते. बिचारीचं व्यक्तिगत जीवन अगदी होरपळून गेलं होतं.

मल्हाररावाच्या नंतर मालेरावास पेशव्यांकडून सरदारीची वस्त्रं मिळाली. अहल्या खंडोबाची प्रार्थना करीत होती, 'खंडोबा, माझ्या पोराला शहाणपणा सुचू दे रे!'

पण गादीवर बसल्यापासून मालेराव चांगलेच गुण उधळू लागला. पैसा आणि सत्ता हाती आल्यावर त्याचा विवेकही संपून गेला. अविवेकाने वागण्यास सुरुवात झाली आणि तो हळूहळू नाशाकडेच जाऊ लागला. गादीवर बसल्यानंतर त्याने अविचाराने वागण्यासच सुरुवात केली. गंगोबा तात्या चंद्रचूड हा किती जुना हुशार दिवाण होता. होळकरांच्या दौलतीची सेवा करण्यातच त्याचं सारं आयुष्य खर्च झालं होतं. ह्या दिवाणसाहेबांना एकदा दरबारात यायला उशीर झाला. काम अडलं होतं. दोन-चार निरोप पाठवून झाले होते. पण दिवाणसाहेबांकडेही काही खास पाहुणे आले होते. त्यामुळे त्यांनाही लवकर निसटता येईना. तासाभराने ते दरबारात आले, तर इकडे मालेरावबाबाची तळपायाची आग मस्तकापर्यंत पोचली. शाळेत उशिरा आलं, की विद्यार्थ्यांना गुरुजी छड्या मारतात त्याप्रमाणे दरबारात उशिरा

आलेल्या दिवाणांना मालेरावाने छड्याच मारवल्या! सारे दरबारी हा प्रकार पाहून हतबुद्धच झाले.

तुकोजी होळकर तर जवळचा नातेवाईक. पण मालेरावाने त्यालासुद्धा हुजऱ्याकडून एकदा गचांडी दिली. असा सगळा सावळा गोंधळ चालू झाला. सत्ता आणि संपत्ती असल्यावर खुषमस्करे जमायला किती वेळ लागणार? उगीचच कुणाला तरी फटक्याची शिक्षा सुनवायची आणि उगीचच कुणालातरी कामगिरीवाचून बक्षीस द्यायचं असा प्रकार सुरू झाला. एका हुजऱ्याला त्याने मोहराच बक्षीस देऊन टाकल्या.

कुणी जरा त्याच्या विरुद्ध बोललं तर तो असा संतापे की विचारू नका. आई किती शांत स्वभावाची, धार्मिक वृत्तीची. पण पोरगा मात्र महा तापट आणि विक्षिप्त निघाला. पोराला ताब्यात ठेवणं अहल्याबाईला अशक्य झालं!

स्वत: अहल्याबाईंना ब्राह्मणांबद्दल अतिशय आदर, वाटत असे! तिचं मन उदार होतं. दान करण्याची तिला अतिशय हौस होती. दक्षिणा, गोप्रदाने, वस्त्रे, जोडे, फळं, धान्य इत्यादी अनेक वस्तू ती प्रसंगाप्रसंगाने ब्राह्मणांना दान देत असे. चातुर्मास चालू होता. एका सोमवारी अहल्याबाईने पाच ब्राह्मणांना बोलाविलं. दूध, केळी दिली. दक्षिणा दिली. प्रत्येक ब्राह्मणाला धोतरजोडी दिली. ब्राह्मणांनी तृप्त होऊन अहल्याबाईंना आशीर्वाद दिला आणि ते घरी जाऊ लागले जाताना ते जोडे घालायला लागले. जोड्यात पाय गेला तो काय! प्रत्येकाला विंचू कडकडून चावला. पाची ब्राह्मण वेदनेने थयथया नाचू लागले! इकडे मालेराव आणि त्याचे मित्र खदखदून हसू

लागले ! ब्राह्मण संतापाने लाल झाले. 'असल्या कारट्याकडून आमचा अपमान करण्यासाठी का आम्हाला बोलावलं ?'


बिचाऱ्या अहल्याबाईच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. तिने ब्राह्मणांच्या चरणांवर डोकं ठेवून प्रार्थना केली, 'क्षमा करा, मला. पोराचें अपराध पोटात घाला. मी तरी काय करू ? पोटी राक्षस जन्माला आला आहे !'

तणतणतच ब्राह्मण निघून गेले. पोराची दुष्कृत्ये, त्याचा बालिशपणा पाहून अहल्याबाईचा धीर पार खचून गेला. ती एकसारखी देवाची प्रार्थना करी. 'खंडोबा, माझ्या पोराला जरा समज दे ! त्याचा हा हूडपणा, व्रात्यपणा कमी होऊ दे !'

मालेरावाच्या दिमतीला अनेक दासी असत. एका सुंदर दासीवर जरीकाम करणाऱ्या एका कारागिराची नजर बसली. हा कारागीर मांत्रिक होता. तऱ्हेतऱ्हेचे मंत्रोपचार त्याला माहीत होते. मालेरावाच्या सुंदर दासीवर त्याची नजर गेली. झाले ! मालेरावाचा संताप उसळला. एके दिवशी मालेरावाने त्याला वाड्यात बोलावून घेतले. आणि मारेकरी घालून त्याचा खून केला ! संशयाचे पिशाच्च माणसाच्या डोक्यावर बसल्यानंतर माणूस काय करेल त्याचा नेम नाही. मरता मरता कारागीर एकसारखा ओरडत होता...' मी काय केले ? मला का मारता ? मी निरपराधी आहे ' पण मालेरावाने त्याचं बोलणं ऐकलंच नाही ! तो संतापाने वेडा झाला होता. त्याचा विवेक पार कोसळून पडला होता. त्याने कारागिराचा खून करविला. कारागीर मरता मरता ओरडत होता, 'मी सूड घेईन, सूड घेईन, तुझ्या उरावर बसेन बघ !...'

वाड्यात कारागिराचा खून झाला त्या दिवशी अहल्याबाईल

ब्रह्मांड आठवलं ! पतीचा आधार नाही, सासऱ्याचं छत्र उडून गेलं आणि पोटचा पोर असा मूर्ख आणि विचित्र ! ... काय योगायोग कुणास ठाऊक परंतु ह्या प्रकारानंतर मालेराव एकदम खूप आजारी झाला ! केलेली दुष्कृत्यं, पापं त्याला रात्रंदिवस भेडसावू लागली. त्याला भयानक, भेसूर स्वप्नं पडू लागली. ज्याचा त्याने खून केला तो कारागीर त्याला स्वप्नात स्पष्ट दिसू लागे. आणि तो दिसला की तो जोरजोराने ओरडत सुटायचा. 'आई ग, मेलो, मेलो, करीत तो मोठमोठ्याने किंचाळू लागे. मुलाची ही भयाण अवस्था पाहून अहल्याबाईचा जीव कळवळून निघे. कसाही असला तरी तो तिच्या पोटचा गोळा



दा. क्र.
विषय किशोर ६०८

होता. ती त्याची आई होती. त्या बिचाऱ्या माऊलीने किती वैद्य, हकीम आणले. मांत्रिक देवऋषी आणले, पण काही केल्या मालेरावाच्या प्रकृतीस आराम पडेना. तो जवळ जवळ भ्रमिष्टच झाला. शरीर मन दिवसेंदिवस खंगू लागलं होतं. अहल्याबाई रात्रंदिवस त्याच्या बिछान्याजवळ बसून होती.

हकीम, वैद्य तऱ्हेतऱ्हेची औषधं सांगत ! ताबडतोब ती माऊली ते उपचार करी. पण कशाचाच गुण दिसेना. उपाय करून करून अहल्याबाई थकून गेली. शेवटी तिने त्या कारागिराच्या आत्म्याला प्रार्थना केली, 'बाबा ! माझ्या पोराला वाचव. तुझ्या नावाने मी एक मंदिर बांधीन. तुझ्या वंशजांना जमीनजुमला देईन. बाबा, माझा जीव घे, पण माझ्या पोराला वाचव !' खरं सांगायचं म्हणजे मालेरावाची सारी दुष्कृत्यं, पापंच त्याला छळत होती. त्याला झोप कशी ती लागत नव्हती. शेवटी दुखणं विकोपाला जाऊन मालेराव मरण पावला. त्यावेळी तो अवघा बावीस वर्षांचा होता ! जेमतेम आठ-दहा महिने त्याने कारभार केला. आपल्या सात्विक, पुण्यशील आईची कसोटी पाहण्यासाठीच त्याने जन्म घेतला होता की काय कुणास ठाऊक !

दुःख करायचं तरी किती आणि कुणासाठी करायचं ? मालेरावाबरोबर त्याच्या दोन बायका सती गेल्या. मूलबाळही नव्हतं ! दौलतीची, राज्याची केवढी मोठी जबाबदारी अहल्याबाईवर येऊन पडली होती. आता एकुलती एक मुलगी मुक्ताबाई आणि तिचा मुलगा नथोबा यांच्याकडे बघूनच ती आपलं जीवन कंठू लागली. नथोबावरच तिची सारी माया जडली होती. इंदूरच्या होळकरांचा भावी वारस म्हणून ती नथोबावर माया-ममता करू लागली. राज्याचा सर्व कारभार ती स्वतः

लागली. अहल्याबाईने तुकोजी होळकराला पेशव्यांकडून सरदारीची वस्त्रे आणवली. व त्याच्याकडे सेनेची सारी व्यवस्था सोपविली. तुकोजीही अहल्याबाईला मान देत होता. तो अहल्याबाईपेक्षा वयाने थोडा मोठा होता. पण मल्हाररावाच्या मागे तो अहल्याबाईलाच धनी मानू लागला. फौजेची आणि मोहिमांची जबाबदारी तुकोजी होळकरांवर सोपवून अहल्याबाई स्वतः कारभार पाहू लागली. तिने आपला धीर खचू दिला नाही. डोळ्यांतील अश्रू पुसून, ही वीरांगना प्रजेची सेवा करण्यास सज्ज झाली.

★

८

## राज्यकारभाराची जबाबदारी

इंदूरपासून जवळच्या नर्मदेच्या काठावर नेमाडप्रांतात महेश्वर नावाचे एक तीर्थक्षेत्र आहे. अहल्याबाईला आता राज्यकारभाराची जबाबदारी पेलावयाची होती. जात्याच ती धार्मिक वृत्तीची. खरं म्हणजे तिला आपलं सारं आयुष्य देवपूजा, व्रतवैकल्ये ह्यातच खर्च करायचं होतं, पण देवाची इच्छा निराळी होती. त्याने तिला आणखी एक कर्तव्य लावून दिलं होतं. मल्हारराव होळकरांनंतर तिला प्रजेची सेवा करायची होती. अहल्याबाईने महेश्वर हे ठिकाण राजधानीसाठी निवडलं. महेश्वर हे प्राचीन माहीष्यति-नगर. रामायण महाभारताच्या काळातही ह्या नगराचे उल्लेख आढळतात. मल्हाररावाने हे शहर जिंकून घेतलं होतं. अहल्या ही मूळचीच धार्मिक वृत्तीची. त्यामुळे तिने ह्या पवित्र नगरीत आपलं वास्तव्य केलं. ह्या शहराचा व्यापार तिने वाढविला. बऱ्याच वेळा कलावंत, कारागिरांना बोलावून या ठिकाणचं वैभव तिने वाढविलं. या क्षेत्री देवळं, वाडे, घाट, बांधू

हितासाठी ती अविरत झटली. देवाचं भजन पूजन आणि प्रजेची सेवा हेच तिच्या जीवनाचं ध्येय झालं होतं.

सूर्योदयापूर्वीच उठून ती स्नान करी. नंतर पूजा-अर्चा करी. ती नियमाने पुराण श्रवणास बसे. दान करण्याची तिला अत्यंत हौस. पुराण श्रवणानंतरचा सारा वेळ दान करण्यात खर्च करीत असे. दाने देऊन झाल्यावर ती आपल्या समक्ष ब्राह्मणांस भोजन घाली... आणि मगच स्वतःचं भोजन करी ! तिचा आहार तिच्या वृत्तीसारखाच सात्विक होता. मद्य-मांस तिने सर्वथैव वर्ज केलं होतं. आपलं भोजन आटोपल्यावर पुन्हा काही वेळ परमेश्वराचं भजन, पूजन करून ती थोडा वेळ वामकुक्षी करी. नंतर ती पोषाख करून सरकारी कामकाज करावयास दरबारात जात असे. तिला पडद्याचं वेड नव्हतं. सूर्यास्तापर्यंत ती दरबारचं कामकाज पाही. त्यानंतर दोन-तीन तास पूजा-अर्चा फराळ वगैरे कृत्यांत जात. मग ती नऊ वाजावयाचे सुमारास पुन्हा सरकारी काम पाहू लागे. तें ती अकरापर्यंत पाही. यानंतर ती निजावयास जात असे. निरहार, उपास, सणवार या गोष्टींकडे तिचं विशेष लक्ष होतं. हरिकथा निरूपण आणि राजकारण ह्या तिच्या जीवनाच्या दोन प्रमुख गोष्टी झाल्या होत्या.

अहल्याबाईचं जीवन असं सुरळीत चाललं होतं. देवाची पूजा-अर्चा आणि प्रजेची सेवा व्यवस्थितपणे चालू होती, पण तिच्या जीवनाचा रस्ता असा सरळ नव्हताच. त्यात काटेकुटे, खाचखळगे कितीतरी होते.

किती झाले तरी अहल्याबाई पडली बाई माणूस. एका स्त्रीने ठकरांच्या इंदूर संस्थानचा त्यांच्या अफाट दौलतीचा कारभार

पहावा. हे पाहून कित्येक सरदारांच्या पोटात दुखू लागे. अहल्याबाईचा स्वभाव अत्यंत तडफदार आणि बाणेदार. अशी तडफ आणि बाणेदार वृत्ती पुरुषाजवळ सापडणंही कठीण ! संकट समोर ठाकलं तरी अहल्याबाई त्याला डगमगत नसे. त्याचा धैर्याने सामना करीत असे. देवाधर्मावर तिची अपार श्रद्धा ! त्यामुळे आलेल्या संकटाने खचून न जाता ती विचाराने वागे. आता तिने चाळीशीचा उंबरठा ओलांडला होता. तारुण्याचा अल्लडपणा, अविचारीपणा निघून गेला होता. एक प्रकारचा विवेक सहनशक्ती आणि प्रौढपणा तिच्या ठायी निर्माण झाला होता.

मालेरावाच्या मृत्यूनंतर बराचसा खासगी पैसा अहल्याबाईच्या हाती आला. पुत्रशोकाने व्याकुळ झालेली माता आपले जन्मजात संस्कार विसरली नव्हती. ब्राह्मणांकडून तिने आधी ‘लक्ष्मी’ची पूजा करविली आणि मगच त्या संपत्तीचा स्वीकार तिने केला. तुळशीपत्र तीर्थात बुडवून अहल्याबाईंनी त्या संपत्तीवर सिंचन केलं.

अहल्याबाईचा एक जुना अनुभवी दिवाण गंगोबा-तात्या म्हणून होता. सुभेदार मल्हारराव होळकराच्या हाताखाली तो तयार झाला होता. कामही चांगले करीत होता ! मालेरावाच्या मृत्यूनंतर गंगोबाच्या मनात विषारी विचारांनी थैमान घातलं. त्याची बुद्धी फिरली अहल्याबाई राज्यकारभार पाहू लागली. आता नवी विट्टी नवे राज्य ! इथे आपली डाळ शिजणार का ? अहल्याबाई ही कुणाच्या ओंजळीने पाणी पिणारी नाही. स्वतंत्रवृत्तीची तेजस्वी बाण्याची ती बाई. इथे हिच्या राज्यात आपली दिवाणगि[illegible]
चालणार ? ही स्वतंत्र बुद्धीची बाई आपल्या मुठी [illegible] हो[illegible]

का ? ह्याची गंगोबाला चिंता वाटू लागली. त्याच्या डोक्यात दुष्ट कलीने संचार केला. त्याची बुध्दीच भ्रष्ट झाली. एक मोठं कारस्थान त्यानं रचलं.

गंगोबा मोठा हिकमती, कारस्थानी माणूस. पण तितकाच भित्रा.

एक दिवस अहल्याबाईंच्या दरबारात त्याने प्रवेश केला आणि बाईंना मुजरा करून म्हणाला,

'बाईसाहेब किती झालं तरी आपण बाईमाणूस. बायकांना राज्यकारभार कसा जमणार ? लोक आपले हुकूम कसे पाळणार लोक आपला अंमल कसा मानणार ? स्त्रीचं कार्यक्षेत्रच भिन्न आहे, संसारच्या चार भिंतीतच तिचं जग आहे. बाईच्या कारभाराला कोण मान प्रतिष्ठा देणार ? तेव्हा आपण दत्तक घ्या आणि सारा कारभार माझ्यावर सोपवा. आपल्याला देवाधर्माची अध्यात्माची आवड आहे तोच मार्ग आपण स्वीकारावा. राजकारणात, खऱ्याचं खोटं, खऱ्याचं खोटं करावं लागतं. माझा सल्ला ऐका बाईसाहेब !'

गंगोबाचा हा उपदेश ऐकून अहल्याबाईला संतापच आला. वास्तविक ह्या दिवाणाला नाक खुपसण्याचं काहीच कारण नव्हतं. तिने गंगोबाचा हा सल्ला ताबडतोब धुडकावून लावला.

'गंगोबा, मी स्त्री आहे माझ्या मर्यादांची जाणीव मला आहे. माझ्या राज्याचा कारभार पाहण्यास मी समर्थ आहे तुम्ही किंवा आणखी कोणी लुडबूड करू नका.' अहल्याबाईने गंगोबाला स्पष्ट शब्दात बजावलं आणि ती आपल्या कामाला लागली.

इकडे गंगोबाच्या मनातल्या दुष्ट विचारांच्या सर्पाने पुन्हा फ[illegible] मारला. अहल्याबाईच्या बाणेदार उत्तराने तो खवळलाच.

अहल्याबाईच्या द्रव्यावरही त्याची नजर होतीच. गंगोबाने राघोबाशी संधान बांधलं. राघोबाने पेशवाईत दुही माजविलीच होती. अशा ह्या कावेबाज राघोबाशी गंगोबाने संधान बांधलं.

गोहदच्या स्वारीत चांगलाच फटका बसला होता. त्यामुळे राघोबा निराश आणि कर्जबाजारी झाला होता. त्याला पैशाची अतिशय अडचण होती. मालेरावाच्या अकल्पित मृत्यूची वार्ता कळल्यावर राघोबा भेलश्यावरून उज्जयनीजवळ आला. गंगोबा मोठा धूर्त. त्याने राघोबाची पैशाची नड ओळखून त्याच्याशी संधान बांधलं आणि राघोबाचे कान भरले.

'दौलत बेवारशी झाली. कोणाकोणाला हिशेबाचा भरवसा येत नाही. अहल्याबाई पडली बाईमाणूस. बायांच्या हातून राज्यकारभार कुठे झालाय ? आपणच इकडे येऊन दौलतीची काळजी घ्यावी. इथले सारे लोक आपलीच वाट पाहत आहेत. राज्यकारभार पाहणं हे काय स्त्रीचं काम आहे ?'

गंगोबाने राघोबाची खुषामत केली. त्याला हरभऱ्याच्या झाडावर बसवलं. आणि दोघांनी मिळून एक षड्यंत्र रचलं. राघोबाला तर होळकरांच्या दौलतीवर डोळा होताच. त्याने तर मोठ्या आनंदाने ह्या कारस्थानात भाग घेतला. राघोबाने इंदूरावर स्वारी करावी, होळकरांची खाजगी दौलत लुटावी, अहल्याबाईला दत्तक घ्यावयास लावावा आणि गंगोबावर दिवाणगिरी सोपवावी अशी सारी योजना होती.

गंगोबाचं हे पाताळयंत्री कारस्थान अहल्याबाईच्या कानावर आलं नुकताच तिने राज्यकारभार हाती घेतला होता. त्या कारभारावरच घाला घालणारं संकट आलं होतं. अहल्ये हो[illegible] मनाला अनंत यातना झाल्या. पहाडासारखा धीर देण

सासऱ्याची तिला आठवण झाली ! 'खरोखर मामंजी असते तर ह्या गिधाडांची एवढी हिम्मत झाली तरी असती का ? मुलाच्या दुःखाने माझी कंबरच खचली आहे ! जरा कुठे आता स्थिर-स्थावर होऊन बस्तान बसू लागलं आहे तर ह्या राघोभरारीने आपल्या दिवाणाच्या संगनमतानं हे संकट आणावं ?' विचार करून करून अहल्या थकून गेली ! पण तिने धीर खचू दिला नाही. प्रथम तिने श्रीमार्तंडाची करुणा भाकली.

'देवा खंडोबा, होळकरांच्या इंदूरवर मोठं संकट आलं आहे. ह्या संकटातून वाचवणारा तूच रे दयाघना ! मी बाईमाणूस. गाठीशी मोठा अनुभव नाही. तूच सोडव ह्या संकटातून.'

खरं म्हणजे गंगोबा आणि राघोबांच्या ह्या दुष्ट कारस्थानाचा प्रथम सुगावा लागला अहल्याबाईच्या दोघा कारभाऱ्यांना शिवाजी गोपाळ आणि राजाराम रणसोड निसबत रावजी महादेव फडणीस यांना. ह्या स्वामिभक्त कारभाऱ्यांना वाटलं, बाईसाहेब थोड्या काळजीत आहेत. आधीच त्या शोकमग्न आणि आणखी त्यांना ही डोकेदुखी कशासाठी द्यायची ? त्यांना एकदम घाबरवून सोडू नये असा विचार करून हे कारभारी हरकूबाई आणि उदाबाईकडे गेले.

त्यांनी राघोबा व गंगोबाच्या कारस्थानाची इत्थंभूत हकीगत त्या दोघींच्या कानावर घातली. शिवाजी गोपाळ म्हणाले, 'आपण बाईसाहेबांपाशी बोलून ह्या गोष्टीचा घरबंध आजपासून केला असता सोईचे पडेल. नाहीतर तुम्हाला घोड्याचे दाणे भरडावे लागतील आणि आम्हास भीक मागावी लागेल. बाईंनी शोक आवरावा. हिंमत धरावी. सरंजामी, इतलाखी यांसी जासूद पाठवून जमा करावे. भोसले, गायकवाड, दाभाडे, शिंदे यांजकडे

सांडणीस्वार पाठवावे. आज आम्हावरी उद्या तुम्हावरी हीच गोष्ट आहे याचा विचार करून फौज पाठवावी असा निरोप पाठवावा. तुकोजीबाबास आमंत्रण पाठवावे.'

कारभाऱ्याचं बोलणं ऐकून हरकुबाई आणि उदाबाईंना आश्चर्याचा जबरदस्त धक्काच बसला. पण तशा त्या दोघी धीराच्या बायका होत्या. अहल्येवर त्यांची फार माया, ममता होती. होळकरशाहीचा अभिमान त्यांच्या नसानसांतून ओसंडत होता. मल्हाररावाची कर्तबगारी त्या विसरल्या नव्हत्या. इंदूरवर राघोबा स्वारी करणार ह्या कल्पनेनंच त्या चिंतामग्न झाल्या. कारभाऱ्याचं बोलणं ऐकून त्या तावडतोब अहल्याबाईकडे आल्या. आणि म्हणाल्या, 'बाईसाहेब, राघोबा हरामखोरीस आला आहे. आताच ह्या क्षणाला सावध झालात तर सुटका. न झाल्यास तुम्हा-आम्हास पुढे दाणे भरडावे लागतील !'

अहल्याबाईला साऱ्या कारस्थानाचा सुगावा लागला होता. ह्या प्रश्नावर तिने खूप वेळ विचार केला. खंडोबा अहल्याबाईचा पाठीराखा होता. परमेश्वराचं अस्तित्व, त्याचं सामर्थ्य ह्यावर तिची श्रद्धा होती. रक्षणासाठी भगवान धावून येतो हे तिला माहीत होतं.

'हरकूबाई, तुम्ही धीराच्या आहात. मला तुम्ही वेळेवर जागं केलंत. खंडोबा होळकरांचा पाठिराखा आहे.' तिने कारभाऱ्यांना तावडतोब बोलावणं पाठविलं आणि मोठ्या जरबेने त्यांना सांगितलं,

'ब्राम्हणाने हरामखोरी आरंभिली आहे. मी बाईमाणूस म्हणून मला दुबळी समजू नका. खांद्यावर भाला टाकून मी उभी राहीन तेव्हा श्रीमंतांचे दौलतीस अवघड पडेल. आमच्या वाडवडिलांनी

खुषमस्करी करून ही दौलत मिळविली नाही; तर तरवारीचे अनुमाने शरीर खर्च केले आहे. तलवारीच्या जोरावर हे वैभव आम्ही मिळवले आहे. तुमचे आमचे ऋणानुबंध सरले असल्यास आम्ही मोंगलांची अथवा फिरंग्यांची चाकरी करू. पण ब्राम्हणांना म्हणावे, आमच्या दौलतीची अभिलाषा बाळगू नका !'

अहल्याबाईचे बोलणे ऐकून कारभारी थक्कच झाले. अहल्याबाई कंबर बांधून राघोबाच्या स्वारीला तोंड देण्याला तयार झाली. तिने भोसले, गायकवाड, दाभाडे, शिंदे यांना गुप्त पत्रं पाठविली. तुकोजी होळकराला निरोप पाठविला, जेवीत असल्यास पाणी प्यावयास आम्हापाशी यावे. मग भेद न होण्याविशी फार जपावे.' वाड्यातील खाजगी निष्ठावान कारभारी गोविंदपंत गानू म्हणून होते. त्याला वाड्याच्या बंदोबस्ताची आज्ञा केली.

अहल्याबाईचा एक लाडका हत्ती होता. त्याच्या पाठीवरील हौदा तीक्ष्ण बाणांनी सज्ज ठेवला. आपल्याकडून तिने लढाईची जोरदार तयारी केली.

एक दिवस अशीच ती लढाईचाच विचार करीत बसली होती. मनात आलं, काय न्याय आहे जगाचा. फक्त पैसा हवा आहे सर्वांना ! बाई माणूस इंदूरचा कारभार पाहत आहे हे पाहून दादासाहेबांच्या तोंडाला पाणी सुटलं आहे ! तिच्या मनात एक कल्पना आली. आपण पुण्याला जासूद पाठवून माधवराव पेशव्यांकडे दाद मागावी. माधवराव समंजस आहे, न्यायी आहे चुलत्याची पाताळयंत्री कृत्यं त्याला नापसंत आहेत अहल्याबाईने लगेच ताबडतोब पेशव्यांकडे दाद मागितली !

माधवराव पेशव्यांनी अहल्याबाईला निरोप पाठविला, 'तुमचे दौलतीविषयी जे पापबुद्धी ठेवतील. त्यांचे पारिपत्य करण्याचा

तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. तुम्हांकडील मुखत्यार दोघे हुजूर जरूर पाठवावे !

इकडे गंगोबाच्या दुष्ट कारस्थानांना तर अगदी ऊत आला होता. राघोबाचा आपल्या कारस्थानांना हातभार आहे हे कळल्या वर तर त्याचे पाय जमिनीवर टेकेनात ! स्वार्थी गंगोबाला वाटलं, चला आता आपल्याला भरपूर पैसा मिळेल... पण पुन्हा एकदा त्याच्या मनातील राजनिष्ठा आणि होळकरनिष्ठा जागी झाली. किती झालं तरी अहल्याबाई बाई माणूस. त्याला तिची कीव आली. बाईला एक-दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगाव्या व मग आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या हाती राज्यकारभार घ्यावा जर तिला ह्या सामदामाच्या गोष्टी रुचल्या नाहीत तर मग राघोबादादाच्या स्वारीची धमकी द्यावी. हे कटु औषध ताबडतोब लागू पडेल व अहल्याबाई निराश होऊन आपल्या म्हणण्यास रुकार देईल...असा विचार करून गंगोबा अहल्याबाईला भेटण्या-साठी तिच्या दरबारी गेला आणि मुजरा करून म्हणाला,

‘बाईसाहेब, राजकारण हा फार विचित्र खेळ आहे बायकांना तो पेलणार नाही, जमणार नाही. आपण दत्तक घ्यावा. सारा कारभार माझ्या हाती द्यावा. तिकडे राघोबादादाही स्वारीचा बेत रचीत आहे ! आपण पुन्हा एकदा विचार करून नीट निर्णय घ्यावा.’

अहल्याबाईने दिवाण साहेबांचं ते मानभावी भाषण ऐकून घेतलं ! व मग शांतपणे ती धीराची व मानाची बाई त्यास म्हणाली;

‘हा बेत होळकरांच्या इभ्रतीस डाग लावणारा असल्याने मी त्यास अनुमोदन कधीही देणार नाही. आमच्या या गृहकृत्यात

राघोबाला हात लावायचा अधिकारच नाही ! माझा मालेराव-बाबा गेला तेव्हाच सुभेदारांचा वंश बुडाला. आता त्यांच्या मागे ज्या दोन पुरुषांचा हक्क होता, त्यांपैकी मी एकाची नायको आणि एकाची आई आहे. होळकरांच्या गादीवर बसणारा मुलगा पसंत करणे न करणे याचा मलाच अधिकार आहे. माझ्यावर कसलेही संकट आले तरी हा माझा वाजवी अधिकार बजावण्यास मी कालत्रयी किंचितही माघार घेणार नाही !'

बिचारा गंगोबा खजील होऊन खाली मान घालून निघून गेला !

अहल्याबाईने दोनच दिवसांनी राघोबादादाला पत्र लिहिलं...

'आपण एका स्त्रीबरोबर युध्द करू नका. नाहीतर तुमच्या नावास जो कलंक लागेल, तो कशानेही कालत्रयी निघणार नाही. मी तर बोलून चालून स्त्रीच. माझा जर युद्धात पराभव झाला तर मला कोणीही नावे ठेवणार नाही. पण जर यदाकदाचित तुमचा पराभव झाला, तर सर्व जगात तुमचे हसे मात्र होईल. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. कारण ते तुम्हासच हितावह आहे. आमचे त्यात काही एक नुकसान नाही.

अहल्याबाईने पत्र पूर्ण केल्यावर पुन्हा एकदा वाचून काढले. त्यावर सही केली आणि विचार केला, एवढे स्पष्ट लिहून दिले आहे. हे माझे निवेदन ऐकल्यावर राघोबादादांनी आपला बेत बदलला तर ठीकच ! नाहीतर आमची तयारी आहेच.

इकडे अहल्याबाईचा निरोप पोचताच मल्हाररावाचे सर्व स्वामिनिष्ठ सेवक तातडीने निघून आले. तुकोजी होळकर तर फारच तातडीने सहा दिवसांत हजर झाला. कित्येक सरदारांचे निरोप आले, 'मल्हारजी होळकरांचा उपकार ज्याच्यावर नाही

असा कोण आहे ? आम्ही सर्व त्यांचे ऋणीच आहोत. प्रसंगास आम्ही आपल्या जवळच आहोत असे समजावे.' भोसले आणि गायकवाड यांनी अहल्येचा कैवार घेऊन तिच्या मदतीला फौजा पाठविल्या. महादजी शिंदे, जानोजी भोसले हे राघोबाचे स्नेही. महादजीने तर दादासाहेबास स्पष्ट सांगितले.

'अशा कामी आपणाला आमच्याकडून साह्य होणे नाही !'

महादजी शिंद्यास गादी मिळावयाचे प्रसंगी राघोबा फार आड आला होता. त्यावेळी मल्हारजीने महादजीची बाजू घेतली होती. तो प्रसंग मनात आणून या प्रसंगी महादजीबाबांनी आपल्यापरी सुभेदाराच्या सुनेस मदत केली.

तुकोजी होळकरांची फौज इंदुरात हजर झाली तेव्हा अहल्याबाईला केवढा धीर वाटला ! इतर अनेक सरदारांनी तिला आश्वासन दिले.

'बाईसाहेब, आम्ही होळकरांचे ऋणी आहोत. आपल्यावर कोणताही प्रसंग आला तरी आम्ही आपल्या मदतीस सदैव तयार आहोत !'

अहल्याबाईने खंडोबाची प्रार्थना केली, 'देवा खंडोबा, तुझीच कृपा !'

राघोबाच्या हालचालींचा सुगावा लागला होता. अहल्याबाईने तुकोजीला वस्त्रे देऊन डेरेदाखल केले. तुकोजीने सर्व सूत्रें हाती घेतली. राघोबा त्यावेळी पन्नास हजार फौजेनिशी उज्जयनी-नजीक अंकपात घाटावर मुक्काम करून होता...

तुकोजीने अहल्याबाईच्या पायावर डोकं ठेवलं व गद्‌गद् स्वरात तो म्हणाला,

'बाईसाहेब, होळकरांची पुण्याई काही अजून संपली नाही ! आपण आशीर्वाद द्या. शेवटी सत्याचाच विजय होणार !'

अहल्याबाईचा कंठ दाटून आला. गादीवर आल्यावर ह्या असल्या संकटाला तोंड द्यावं लागेल ह्याची तिला कल्पनही नव्हती.

'तुकोबा, तुला आशीर्वाद देते. होळकरांना पराजय माहीत नाही ! विजयाची माळ गळ्यात घालून ये आम्ही तुझी वाट पाहत आहोत ?'

तुकोजीने सारी पाहणी केली. आणि दादासाहेबाकडे सांडणी-स्वार पाठविला, 'क्षिप्रा उतरला असता तुमची आमची तलवार चालेल. याचा विचार करून मग पाऊल टाकणे !'

तुकोजीचं पत्र वाचून राघोबा मोठा बुचकळ्यात पडला. त्याचं डोकं विचारांनी गलबलून गेलं. तो मनाशी म्हणाला, 'आपण जर दुसऱ्याचे घर लुबाडायला गेलो तर ते आपला प्राण जाई तोपर्यंत प्रयत्न आणि परिश्रम करण्यास चुकणार नाहीत. श्रीमंत पेशव्यांची-ही आपल्या ह्या कृत्याला मदत नाही. सगळ्यांची सहानुभूती अहल्याबाईकडेच. शिंदे, गायकवाड, भोसले सगळे बाईंच्याच बाजूने ! एकदा वाटलं होतं अहल्याबाई बाईमाणूस, आपल्या स्वारीच्या धमकीने घाबरून जाईल. लढणार तर नाहीच, तह करील. खंडणी देईल. पण सारी आशा फोल ठरली !'

इतक्यात एक सरदार राघोबाकडे धावत धावत आला. व घाबरत घाबरत सांगू लागला,

'दादासाहेब, अहल्याबाईसाहेबांनी लढाईची केवढी जय्यत तयारी चालविली आहे. केवढा उत्साह दाखविला आहे ह्या बायांनी ! महाराज, दोनशे स्त्री घोडेस्वार सर्वांच्या पुढे आहेत

आता ह्या बायकांशी का आम्ही लढाई करायची सांगा तुम्हीच !'

हा सर्व प्रकार ऐकून राघोबादादा बुचकळ्यातच पडला. काय करावं तेच त्याला सुचेना. समजा, ह्या युद्धात आपला जय झाला तरी त्यात एवढं काही मोठं कर्तृत्व, पराक्रम नाही ! लोक म्हणतील, एका स्त्रीबरोबर युद्ध करून विजयाची घमेंड मिरवीत आहे ! पराभव झाला तर बाईकडून हरलो गेलो. ह्यासारखी मानहानी नाही. अशा स्थितीत लढाई टाळावी आणि आपणच आपली अब्रू राखावी ह्यासारखी चांगली गोष्ट नाही !

'मल्हारराव होळकर यांचा आणि आमचा जुना ऋणानुबंध आहे. मालेरावबाबा वारले यास्तव आम्ही आपल्या समाचारास येत आहोत. आपल्याशी लढाई करण्याचे आमच्या स्वप्नातही आले नाही ! बाईमाणसांशी युद्ध करण्यात आम्ही आमचे शौर्य दाखवू इच्छीत नाही. आपला काहीतरी गैरसमज झालेला दिसतोय !'

तुकोजीरावाने पत्र वाचलं तेव्हा त्याला राघोबाच्या धूर्तपणाचं हसूच आलं. त्यानेही खोचकपणे उत्तर लिहीलं,

'आपण अहल्याबाईंच्या समाचारास येणार आहात हे समजले. पण मग त्यासाठी एवढी फौज जमा करून येण्याचे कारण काय? आपण पालखीत बसून एकटे यावे. आम्ही पेशव्यांचेच सेवक आहो. आमचे घरदार, फौज, दौलत वेगळी आहे का ? आपण खुशाल आनंदाने यावे !'

तुकोजीने अहल्याबाईला ही सारी हकीगत सांगितली. तेव्हा तिला हसूच आलं.

'तुकोजीबाबा, खंडोबाने केवढं संकट दूर केलं. दारी आलेल्या पाहुण्याचा सत्कार करण्याला होळकरांचं घराणं सदैव तयारच

ाहे. पण शत्रूला मात्र खडे चारायला ते कधीच मागे पाहणार ाहीत !

क इकडे तुकोजीच्या पत्राला राघोबा काय उत्तर देणार ? एकदा आता जे सोंग घेतलं ते पूर्ण केलंच पाहिजे. एक सत्य लपवायला एकदा खोटं बोललं, की आणखी किती बतावणी करणार ? प्रकरण अधिक चिघळायला नको असा विचार करून राघोबा-दादा पालखीत बसले. पाच-सहा सरदार, शागीर्द त्यांच्याबरोबर होते.

तुकोजीने राघोबादादांच्या पायावर डोकं ठेवलं. काय किमया बघा, जो राघोबा अहल्याबाईवर स्वारी करणार होता, तोच राघोबा एक महिनाभर अहल्याबाईकडे पाहुणा म्हणून राहिला. लढाईचे ढग निवळून गेले... स्नेहाचा-स्वच्छ सुंदर सूर्यप्रकाश सर्वत्र पसरला.

हरकूबाई, उदाबाई ह्या दोघींची अहल्याबाईवर फार श्रद्धा. हरकूबाई उदाबाईला म्हणाली,

‘ उदाबाई, बाईसाहेबांची मुत्सद्देगिरी बघ. म्यानातली तलवार काढली नाही, धनुष्याला बाण लावला नाही. आणि शत्रूलाच आपल्या घरचा पाहुणचार दिला ! ’

‘ हरकूबाई, ही बाई म्हणजे देवताच आहे ! राघोबाला तिने कसा चांगला धडा शिकवला ! लढाईचं केवढं संकट टळलं ! ’

दोघीजणी अहल्याबाईकडे गेल्या. आणि त्या दोघींनी अहल्या-बाईचे पायच धरले. अहल्याबाई अगदी संकोचून गेली.

‘ उदाबाई, हरकूबाई अहो, तुम्ही माझ्याहून मोठ्या. अशी उलटी गंगा वाहते का ?

‘बाईसाहेब ! तलवारीचा एकही वार न चालवता आपण शत्रूला जिकलंत !’

‘उदाबाई, ही सारी खंडोबाची कृपा. संकटाच्या वेळी तोच आपल्याला सुबुद्धी देतो. मामंजींची पुण्याई आहे आपल्या पाठीमागे.’

अहल्याबाईने राघोबादादाला उत्तम पाहुणचार दिला. अहल्याबाईची लोकप्रियता, तिचं आदर्श, धार्मिक जीवन पाहून राघोबा खजिल झाला.

शिंदे, भोसले, गायकवाड, ह्या सर्व सरदारांनी अहल्याबाईला मोठी सहानुभूती दाखविली होती. अहल्याबाईने त्या सर्वांना थाटाची मेजवानी दिली. कोणास कंठी, कोणास शिरपेंच, कोणाला धन, वस्त्र देऊन त्या सर्वांचे तिने मोठ्या प्रेमाने आभार मानले.

‘महादजीबाबा, तुम्ही सर्वांनी उपकार केल्यानेच आमचा बचाव झाला.’

अहल्याबाईची ही कृतज्ञता पाहून सर्व सरदार थक्क झाले.

अहल्याबाईच्या तेजापुढे राघोबाचं काही चाललं नाही. त्यांनी अहल्याबाईची चार-पाच वेळा भेट घेतली. इकडची तिकडची खुशालीची बोलणी केली !

‘अहल्याबाईसाहेब, आपण मल्हाररावजींची सून शोभता खऱ्या ! आज वीस-पंचवीस दिवस मी आपला कारभार बघतो आहे. आपली कर्तबगारी, धैर्य, धार्मिक वृत्ती पाहून आम्ही बेहद्द खुश झालो आहोत !

‘दादासाहेब, मामंजीनी मला तयार केलं. ही सारी त्यांचीच कृपा. खंडोबा माझ्या पाठीशी आहे संकटकाळी भक्तांना तारणारा भगवान ! आपण फक्त निमित्त मात्र !’

'पुत्रशोकाचं दुःख बाजूला सारून आपण जन-हित, जन-कल्याणाला आपलं आयुष्य वाहून घेतलंत !'

'दैवापुढं कुणाचं काही चालणार नाही ! शोकाने खचून जाऊन चालणार नाही असा मनाशी निश्चय केला आणि जन-सेवेचं व्रत घेतलं ! पूजा-अर्चा, प्रार्थना ह्यांनी माझ्या मनाला शक्ती मिळते !'

अहल्याबाईचे विचार ऐकून राघोबादादाला फारच कौतुक वाटलं. किती पवित्र विचार ! केवढी थोर स्त्री ! आणि हिच्या राज्यावर आपण स्वारी करायला निघालो होतो ! देवानेच आपल्याला वाचविलं.

दादासाहेब बरेच दिवस इंदूरला राहिले. नंतर उज्जैनीस जाऊन सत्वासचे घाटाने गेले. थोड्याच दिवसांनी ते गुजरातच्या वाटेने दक्षिणेस गेले.

'तुकोजीबाबा, सारं नाटक संपलं. आजच आम्ही तुम्हाला सरदारीची वस्त्रं देणार आहोत.'

'बाईसाहेब, एकच विनंती. सारा शेवट गोड झाला. पण ह्या साऱ्या त्रासाचं मूळ तो गंगोजी. त्याचं काय ? हा साप असाच इंदूर दरबारी ठेवणं आम्हाला अत्यंत धोक्याचं वाटतं !'

'बरोबर आहे तुकोजी. गंगोबाचं कारस्थानच ह्या सर्व भीषण नाट्याचं मूळ आहे. हा साप इथे ठेवण्यात अर्थ नाही. तो ठेचून टाकलाच पाहिजे. मी त्याला एकदम कामावरून दूर करून टाकणार आहे !'

'छानच होईल बाईसाहेब. होळकरांच्या दौलतीवरचं संकट

निवारण्यात आम्ही सदैव तयारच आहोत. पण हे असले कारस्थानी साप आपल्या घरात नकोत !'

राघोबादादा सुखरूपपणे गेल्यावर अहल्याबाईने खंडोबाची प्रार्थना केली.

'देवा, दयाघना तूच तारलेस मला ह्या संकटातून !'

★

९

## अनंतफंदीचे हृदयपरिवर्तन

दिवस चालले होते. अहल्याबाईला वाटू लागलं आता हे राजकारण पुरे, कारभार पुरे. आता फक्त देवाचं भजन-पूजन करावं. ब्राह्मणांना दान करावं. तिच्या सासूबाई गौतमाबाई अतिशय धार्मिक होत्या. त्यांच्या वर्तनाचे संस्कार अहल्याबाईवर झाले होते. अहल्याबाईच्या ह्या धार्मिक वृत्तीने तिच्या जीवनाचा सारा रंगच पालटून गेला होता.

श्रावण महिन्यात अहल्याबाई वाड्यात भागवताचा सप्ताह करी. पौर्णिमेस तो पूर्ण झाल्यावर सर्वांना यथास्थित दानधर्म करी ब्राह्मणांना भागवतांची पुस्तकं दक्षिणा, शालजोड्या पागोटी देई.

अनंतफंदी घोलप ह्या नावाचे एक यजुर्वेदी ब्राह्मण संगमनेरला राहत होते. त्यांच्या पूर्वजांचा गोंधळीपणाचा धंदा होता. थोडीशी दुकानदारीही होती. अनंतफंदी लावण्या रचीत, तमाशे करीत. अहल्याबाईची कीर्ती अनंतफंदीच्या कानावर आली होती.

म्हणून ते एकदा आपल्या साथीदारांसह महेश्वरला यायला निघाले ! सारा प्रवास अतिशय कष्टाचा होता. वाटेत सातपुड्याचे पर्वत लागले. तेथे भिल्लांचा केवढा उपद्रव ! हे भिल्ल जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना लुटीत. त्यांची चीजवस्तू घेत ! त्यामुळे सारीजण अतिशय घाबरून जात असत.

फंदीबुवा आपल्या अनुयायांसह सातपुड्याच्या मध्यभागी आले ! साऱ्या भिल्लांनी त्यांना गराडा घातला, आणि त्यांच्या जवळचं सारं धन लुटून टाकलं.

पण अनंतफंदी मोठे प्रसंगावधानी त्यांनी लगेच त्या भिल्लांवर एक लावणी रचली. व ती त्यांना म्हणून दाखविली ! ती ऐकून भिल्लांना व त्यांच्या नाइकांना फारच आनंद झाला. त्यांनी अनंतफंदीस त्याचं सर्व धन देऊन टाकलं. शिवाय त्याला पोषाख व दोनशे रुपये दिले. नायकाने फंदीबुवाची सारी हकीगत ऐकली.

'अहो, भिल्लराजे, आम्ही त्या पुण्यश्लोक 'गंगाजल निर्मळ मातु:श्री' अहल्याबाईच्या दर्शनासाठी जात आहोत !'

'अहल्याबाईला भेटायला ?' भिल्लांनी आश्चर्याने विचारले.

'अरे, इकडे या. धावत या. या आपल्या ब्राह्मणबुवाला अहल्यादेवींच्या महेश्वरी नेऊन पोचवा. वाटेत त्यांना काही त्रास होऊ देऊ नका. सुखरूप नेऊन पोचवा !

आपल्या पुढाऱ्याचा हुकूम ऐकल्यावर भिल्लांनी अनंतफंदीला सुखरूप महेश्वरी नेऊन पोचवलं.

अहल्याबाई, तमासगीरांना कधीच विन्मुख पाठवीत नसे. त्यांनी आपल्या कलेचं प्रदर्शन केलं, म्हणजे ती त्यांना योग्यतेनुसार काही ना काही देईच.

एके दिवशी राजवाड्यात अनंतफंदीचा खेळ झाला. अहल्याबाईने तो खेळ पाहिला. खेळ झाल्यानंतर तिनें अनंतफंदीबुवांना एकीकडे बोलावून उपदेश केला,

'तुम्ही ब्राह्मण अशी कवनं करण्यात आपलं कवित्व खर्चं करता ! देवाची भजनं रचा, स्तोत्रं रचा. स्वतःचा स्वार्थ साधा आणि त्याबरोबर परमार्थही बघा. लोकांचं हित बघा. अहल्याबाईचं हे बोलणं ऐकून अनंतफंदी अगदी खजील झाला तो मूळचा. तसा चांगला होता. पण संगत वाईट, त्यामुळे बिघडला. अहल्याबाईसारख्या साध्वीच्या उपदेशाचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला. ताबडतोब त्याने डफावर बुक्की मारली. तो फोडून टाकला आणि अहल्याबाईच्या पायावर डोकं टेकलं.

'बाईसाहेब ! आजपासून तमाशा सुटला ! आता डफावर थाप मारणार नाही, लावण्या रचणार नाही. तुम्ही मला देवताच भेटल्यात जणू !

'अनंतफंदी, मला फार आनंद वाटला. ही घे तुझी तमाशाची बिदागी.' अहल्याबाईलाही आनंद झाला होता. एका तमासगीराचं हृदयपरिवर्तन झालं होतं.

'नाही. बाईसाहेब, आता मला तमाशाची बिदागी नको. आपण मला जागं केलंत. तमाशाच्या गर्दीतून ओढून काढलंत. भगवत् भजनाची वाट दाखविलीत हीच माझी बिदागी !'

तमाशाची बिदागी न घेताच अनंतफंदी संगमनेरला परत आला. आता त्याने तमाशा करावयाचं सोडून दिलं होतं.

या गोष्टीस काही दिवस लोटून गेले. संगमनेरला स्वामी अनंत ह्यांचा दरसालाप्रमाणे उत्सव सुरू झाला. गावच्या पाटीलबुवांनी आणि इतर मंडळींनी अनंतफंदीला तमाशा करायला सांगितलं.

फंदीबुवांना अहल्याबाईला दिलेल्या वचनाची आठवण आली, 'बाई, मला तमाशाची बिदागी नको...' पुनः पुन्हा कानात तेच वाक्य घुमत होतं. पुनःपुन्हा अहल्याबाईचा उपदेश आठवत होता. 'अशी कवनं करण्यात आपलं कवित्व कशासाठी खर्च करता ?'

परंतु ग्रामस्थांचा इतका आग्रह पडला, की तो अनंतफंदीस मोडवेना. तो पडला भिडस्त !

'फंदीबुवा, तमाशा केलात तर काय बिघडणार हो ? इतके दिवस काय करीत होता ? आता आम्ही एवढे तुमच्या पाया पडतो, तमाशा करा – तमाशा करा तर आम्हाला धुडकावून लावता होय ? फंदीबुवा जळात राहून माशाशी वैर कशाला करता ?'

ग्रामस्थांची आग्रहाची विनंती फंदीबुवांनी ऐकली आणि तमाशा करण्याचं कबूल केलं. आणि योगायोग तरी किती विचित्र ! त्याचवेळी अहल्याबाईची स्वारी पुण्यास जात होती. तिला रस्त्यावर माणसांची खूप गर्दी दिसली. खूप गडबड दिसली.

'कशाची एवढी गर्दी ?' तिने प्रश्न केला.

'बाईसाहेब, आज गावात फार मोठा तमाशा चालला आहे. सारं गाव लोटलं आहे. काय लावणी रचतो !'

बरोबरचा शिपाई वर्णन करू लागला.

'पुरे ! पुरे ! मला ह्या तमाशाचा अगदी तिटकारा आहे, अरे, एक चाकर पाठव बघू आणि पाहून ये कोण तमाशा करीत आहे कोण लावणी गात आहे ?'

चाकर धावतच गेला आणि थोड्याच वेळात सांगत आला,

‘ बाईसाहेब, अनंतफंदीचा तमाशा चालला आहे. केवढी गर्दी !

‘अनंतफंदीचा तमाशा ?’ अहल्याबाईच्या डोळ्यांसमोर मागचा सारा प्रसंग चित्रासारखा उभा राहिला. तिला फार वाईट वाटलं.

‘ मी स्वत:च जाऊन पाहते आणि त्याला आता चांगली शिक्षा करते.’ असं मनाशी म्हणून ती तरातरा तमाशाच्या जागी पोचली.

कशी कुणास ठाऊक, पण तमाशात दंग असलेल्या अनंतफंदीच्या कानावर ही बातमी आली ! त्याची तर भीतीने गाळणच उडाली ! काय करावं ? बाईंनी आपल्याला पूर्वी एकदा ताकीद दिली होती. आता त्यांनी पुन्हा ह्या तमाशाच्या फडामध्ये येऊन आपल्याला बजावलं काय करायचं ? सगळीच फजिती ! परंतु अनंतफंदीच्या जवळ संयम सूचकता होती. तो तसा मोठा धूर्त होता. तावडतोब खुणा करून त्याने सर्व टाळकऱ्यांना खाली श्रोत्यांमध्ये बसविलं. सारे नाचणारे चटकन कुठेतरी दडून बसले. फक्त एक टाळकरी त्याने आपल्यामागे उभा केला. आणि लावणी बंद करून मध्वमुनींचे भक्तिरसपूर्ण गीत गाऊ लागला.

‘ हरी तुझी मुरलीधर घेणी.
मुरलीने कसे लाविले पिसे...’

अहल्याबाई तिथे पोचली तो गोपींचा अढळ भक्तीवर अनंतफंदीचे रसाळ कीर्तन चालले आहे ! सारे श्रोते तल्लीन झालेले ! फंदीबुवांचा कीर्तनाचा हा पहिलाच प्रसंग. परंतु त्याने कीर्तनाला चांगलाच रंग भरला. तसा तो पट्टीचा वक्ता. गोपींची श्रीकृष्णावरील अपार भक्ती तो आळवून आळवून श्रोत्यांना पटवू लागला.

अहल्याबाईला कीर्तनाची फार आवड. तिला फार आनंद झाला. इकडे अनंतफंदीने तर असं भासविलं, की आपण कसलेले हरिदास आहोत. अहल्याबाई धन्य झाली. तिने कीर्तन ऐकून हरिभक्तपरायण अनंतबुवांना भरजरी पोषाख आणि सुवर्णाची कडी इनाम दिली !

★

१०

## राजा हा प्रजेसाठीच आहे.

अहल्याबाईची देवधर्मावर अतिशय भक्ती ! लहानपणापासून तिला गरिबांची फार दया येई. कुणी भुकेला पाहिला, की तिचं कनवाळू मन लगेच त्याच्या मदतीसाठी धावत जाई.

होळकरांचा खाजगी खजिना तिच्या हाती आला. इतर सर-दारांना वाटलं, बाई ह्या एवढ्या संपत्तीचं काय करणार ? अहल्याबाईने ब्राम्हणाकडून संकल्प म्हणवून त्यांच्यावर तुळशी-पत्र ठेवले. व तो सारा पैसा धर्मकार्यात खर्च करण्यासाठी वेगळा बाजूला ठेवला.

त्या दिवशी सकाळीच स्नानानंतर अहल्याबाई तुकारामाची गाथा वाचीत होती.

'जे कां रंजले गांजले ।
त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेंची जाणावा ॥'

इतक्यात तिच्या कानावर कुणाचं तरी रडणं आलं ! लगेच सेवकांकडून तिने चौकशी केली,

'बाईसाहेब एक म्हातारा भिकारी भुकेने व्याकुळ होऊन रडत आहे !'

'माझ्या राज्यात माझ्या राजवाड्याजवळ एक भुकेने तडफडणारा भिकारी आहे ?'

अहल्याबाईने तुकारामाची गाथा बंद केली व तिने मुदपाकखान्यात जाऊन नोकराकडून त्या भिकाऱ्याला अन्न दिलं. पोटातील भुकेचा अग्नी शांत झाल्यावर त्याने अहल्याबाईला दुवा दिला. त्या दिवसापासून तिने रोज सकाळी गरिबांना अन्न देण्याची व्यवस्था केली.

उन्हाळ्याच्या दिवसांत माळव्यात लोकांचे फार हाल होत. त्यासाठी तिने जागोजागी पाणपोया घातल्या.

अहल्याबाईची भूतदया असामान्यच होती. तिच्या भूतदयेचा वाटा वनातील पशूंना मोठमोठ्या महालांवर, झाडांवर राहणाऱ्या चिमुकल्या पक्ष्यांना, नद्यात राहणाऱ्या माशांनाही मिळाला होता. ह्या प्राण्यांची भक्ष्यं त्यांना नित्यनियमाने पाठविली जात. तिचे चाकर बैलांना पाणी पाजण्यासाठी ठिकठिकाणी हिंडत. शेतकरी आपल्या शेतावर पक्ष्यांना फिरकू सुद्धा देत नसत. अहल्याबाईने पक्ष्यांसाठी मुद्दाम शेतं राखून ठेवली. अशा शेतांवर पक्ष्यांचे थवेच्याथवे बसलेले दिसत.

जागोजागी अन्नछत्रे, तळी, बावड्या, देवळं, धर्मशाळा बांधण्याचं काम अहल्याबाईने हाती घेतलं ! होळकरांचं सुमारे पंधरा लाखाचं खाजगी उत्पन्न होतं. अहल्याबाईची स्तुती करणारी

आर्या पंतांनी रचली. अहल्याबाईची त्यांनी पवित्र गंगेशी तुलना केली.

'देवी अहल्याबाई, यावी भेटावयास सत्वर ती !
तू पुण्यकीर्ति हे ही। गंगे दोघी जणीस सत्वर ती.'

मोरोपंतांचं अहल्याबाईविषयी फार चांगलं मत होतं. यात्रेहून परत जाताना या साध्वीची भेट घेण्यासाठी म्हणून ते मुद्दाम महेश्वर मुक्कामी गेले ! अहल्याबाईला विद्वान ब्राह्मणांविषयी अतिशय आदर वाटे. आपल्या गावी एक मोठा गाढा पंडित आला आहे ही बातमी तिच्या कानी गेली. तिने त्यांना पालखीतून भेटावयास घरी आणलं. पंतांनी तेथेच अहल्याबाईच्या स्तवनपर काही आर्या रचल्या. अहल्याबाई त्या आर्या ऐकत होती पण तिला वाटत होतं, 'खरंच का माझी एवढी योग्यता आहे ?'

पंत आर्या गात होते !

श्री हरिहर भक्ता, तू देवी, अहल्ये वरा धरा भूषा
पूषा तुज साधु म्हणे ख्याता, तुजसम न बाणातनु भूषा
देवीं अहल्याबाई ! झालीस जगत्रयात तू धन्या
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या
धर्मार्थ गोत्र जन्या किंवा झालीस तू धरा जन्या
तुज देवि, भेटली जी सत्कीर्ति कधीच हे न राजमन्या।
जाणे धर्म करीना त्या स्तविती कोण पंडितमन्या।
न न्याय धर्मनिरता अन्या कालिमाजि ऐकिली कन्या
न त्याजिसी नर्मदेते देवी ! तुझी नी बहु प्रिया आली
गंगेचीहि सखी हो की उभयमनात सक्रिया आली
श्री विष्णुपदा ! स्तविली त्वभ्दक्तां हे तुलाहि मानावे
विश्व जिला वानितसे का न मयूरेहि तीस वानावे

ह्या आर्या ऐकता ऐकता अहल्याबाई फारच लाजून गेली. ह्या निरहंकारी बाईला वाटे, एका परमेश्वराचीच काय ती स्तुती करावी. माणसाने माणसाची का स्तुती करायची ?

'कविराज, परमेश्वराची स्तुतिस्तोत्रं गावी. आम्हा पामराची स्तुतिकवने कशासाठी गाता ? तो सकल सर्व श्रेष्ठ भगवान ! तोच करता कविता ! आपण कोण ?'

'बाईसाहेब मला तरी कुठे मानवाची स्तुती करायला आवडते प्रत्यक्ष माझ्या यजमानासाठी दहा-बारा आर्या रचिल्या आहेत. बाजीराव पेशव्यांच्या आश्रयाचाही मी स्वीकार केला नाही. मी काही चार चांदीच्या तुकड्यांसाठी कविता रचीत नाही ! बाईसाहेब, मी एक निस्पृह कवी आहे. मला ना पैशाचा लोभ ना प्रसिद्धीची हाव. ह्या कविता म्हणजे माझ्या मनात आपल्या विषयी जो आदरभाव आहे. त्याचंच फळ आहे. त्याच्यामागे लक्ष्मीची लालसा नाही. हा सरस्वतीचा प्रसाद आहे. तो आपण स्वीकारावा ! उगीच वाटेल त्याची स्तुती करून मी माझी जीभ बाटविणार नाही !'

कवी पंतांचं हे निवेदन ऐकून अहल्येला क्षणभर काय उत्तर द्यावं तेच समजेना. तिने कवीला आदराने प्रणाम केला. सालीना पाचशेवर रहावयाचा पुष्कळ आग्रह केला, पण मोरोपंतांची आपल्या यजमानांवर आत्यंतिक भक्ती असल्यामुळे अहल्याबाईंच्या म्हणण्यास त्यांनी अनुमोदन दिलं नाही. अहल्याबाईने मोरोपंताचा सन्मान करून त्यांस एक शालजोडी अर्पण केली.

★

११

## प्रजाप्रेम

दिवसें दिवस अहल्याबाईचं आपल्या प्रजेवरील प्रेम वाढतच गेलं होतं. इंदूरवर तिचं अधिकच लक्ष असे. देवीचंद या नावाचा एक धनाढ्य सावकार इंदुरात मरण पावला. बिचाऱ्याला मूल-बाळ काही नव्हतं. ह्याच सुमाराला तुकोजीरावाचा तळ तिथे पडला होता. सावकाराची एवढी प्रचंड संपत्ती. ती पाहून तुकोजी-रावाच्या तोंडाला पाणी सुटलं. ह्या सावकाराची संपत्ती आपण सरकारजमा करावी...लोकांनी त्यांचे कान भरले. तुको-जीनेही विचार न करता आपल्या उपदेशकांच्या सांगण्याप्रमाणेच व्यवहार केला.

आपल्यावर आलेलं हे संकट पाहून देवीचंदाची बायको तावड तोब महेश्वरला आली. थंडीचे दिवस होते...त्या दिवशी अहल्या-बाईच्या मनात आलं, आपणाला एवढी थंडी सहन होत नाही ! उबदार घोंगड्या आहेत. साऱ्या सुखसोयी आहेत. आणि ही गरीब बिचारी माणसं थंडीनें कुडकुडत आहेत ! मनात विचार

आला की अहल्याबाईने तो कृतीत आणलाच. तिचे मन कर्णा-सारखे उदार. दानाचा विचार मनात येताच तिचे दोन्ही हात भरभरून दान करू लागत. कारभाऱ्याला बोलावून तिने एक हजार घोंगड्या आणवल्या. आणि स्नान, पूजा झाल्यावर गरीबांना त्या वाटण्यास सांगितल्या. हा कार्यक्रम संपला.

इतक्यात कुणी दासीने येऊन अहल्याबाईला सांगितलं, 'बाई-साहेब, आपल्याला भेटण्यासाठी श्रीमंत देवीचंदांची विधवा पत्नी आली आहे.'

अहल्याबाईने तिला ताबडतोब महालात बोलावून घेतलं, तिची विचारपूस केली. तिचं सांत्वन केलं.

देवीचंदाची बायको डोळे पुशीत म्हणाली, 'बाई, कुंपणच शेत खाऊ लागलं तर आम्ही तक्रार कुणाकडे करायची ? माझ्या मालकांची प्रचंड इस्टेट तुकोजीबाबा सरकारजमा करायला निघालेत.

अहल्याबाईने बाईचं सारं बोलणं ऐकून घेतलं आणि शेवटी निर्णय दिला, 'ही बाई आपल्या यजमानांच्या धनदौलतीची सर्वस्वी मालकीण आहे ! तिची संपत्ती सरकारजमा करण्याचा आमचा मुळीच विचार नाही !' इतकंच नव्हे तर तुकोजीस आज्ञा केली की, 'तुम्ही इंदुरापासून जरा दूर उतरावे. माझ्या प्रजेवर जुलूम करून तिला त्रास देऊ नये !'

अहल्याबाईच्या पायांवर डोकं ठेवून ती विधवा स्त्री घरी गेली.

हा सारा प्रकार पाहून तुकोजीस फार पश्चाताप झाला. त्याने अहल्याबाईची आज्ञा मानली ! उगीचच एका निराधार विधवा

स्त्रीच्या पैशांवर आपला डोळा ठेवला ह्याचं त्याला फार वाईट वाटलं.

इंदूरकरांची मनं अहल्याबाईच्या भक्तीने भारावून गेली.

ह्यानंतरच काही दिवसांनी अहल्याबाईच्या राज्यातील एक धनाढ्य सावकार मरण पावला. बिचाऱ्याला मूल-बाळही नव्हतं. एके दिवशी अहल्याबाई पत्रव्यवहार बघत होती. त्यातच एक अर्ज आला होता. अहल्याबाई तो अर्ज वाचू लागली.

'माझी दौलत फार आहे. मी निपुत्रिक. पतीचाही आधार नाही. अशा परिस्थितीत मला ह्या अफाट संपत्तीचा वारस करण्याकरिता दत्तक घेण्याची परवानगी द्यावी !'

जवळच अहल्याबाईचे चार कारभारी बसले होते. अहल्याबाईने त्यांना ते पत्र वाचायला दिलं. चारी कारभाऱ्यांनी अहल्याबाईला सल्ला दिला, 'बाईच्या अर्जाप्रमाणे दत्तकाची परवानगी द्यावी. परंतु नजराणा भरपूर घ्यावा. कारण मयत सावकाराजवळ अफाट पैसा आहे.'

अहल्याबाईने कारभाऱ्यांचं बोलणं ऐकून घेतलं. त्यावर थोडावेळ विचार केला व स्पष्टपणे ती सांगू लागली, 'ह्या श्रीमंत विधवा स्त्रीला दत्तकाची परवानगी द्यावी. परंतु नजराणा कशाकरिता घ्यावा हे मात्र माझ्या लक्षात येत नाही. तिच्या नवऱ्याने मेहनत करून पैसा मिळविला. आता तो मेला. तेव्हा त्याची विधवा पत्नी दत्तकासाठी आपली परवानगी मागते. शास्त्राप्रमाणे तिला पुत्र घेण्याचा अधिकार आहेच. परंतु आपण थोर राजे. आपली परवानगी असावी. आपण उगीचच तिला दत्तक घेण्यास बंदी करू ह्या भीतीने तिने आपल्याकडे अर्ज केला ! तिला अभय देणं हेच ह्यावेळी आपले पवित्र कर्तव्य आहे !

आता तिला आपण दत्तक घेण्याची परवानगी देऊ. सांगू, की 'तुम्हास शास्त्राप्रमाणे चालण्यास आमची काहीच हरकत नाही. खुशाल दत्तक घेऊन संपत्तीचा उपभोग घ्यावा.' पुन्हा ही परवानगी तिला देण्यासाठी आपण नजराणा रूपी दंड तिच्याकडून घेतला तर ती निराधार विधवा आपलीही राजाज्ञा मानेलही. परंतु हा पापाचा पैसा होईल. आपण हे द्रव्य जबरदस्तीने घेतल्यासारखं होईल ! सबब नजराणा एक पै सुद्धा घेणे नाही !'

अहल्याबाईचे स्पष्ट निवेदन ऐकून चारी कारभारी गप्प बसले. त्यांना वाटलं, ही बाई माणूस ! ही आपला सल्ला चटकन ऐकेल. अहल्याबाईने ताबडतोब पत्र लिहिण्यास सांगितलं.

'तुम्ही दत्तक घेणार हे ऐकून आम्हास परम संतोष झाला. पूर्वीपासून तुमचा लौकिक चालत आला आहे. तो सांभाळून चालावे, म्हणजे सरकारास त्याहून अधिक संतोष होईल ! तुमच्या संपत्तीचे तुम्ही मालक. यास्तव आम्ही तुम्हापासून विनाकारण काहीएक नजराणा घेत नाही. अशा प्रकारे द्रव्य जमा करण्याची सरकारची इच्छा नाही !'

कारभाऱ्याने पत्राचा मजकूर अहल्याबाईला वाचून दाखविला. तेव्हा तिला खरं समाधान वाटलं.

रात्री झोपताना तिने खंडोबाची प्रार्थना केली. देवा ! उगीच कुणाचे द्रव्य लुटण्याचा मोह मला पाडू नको. अहल्याबाई शांत चित्ताने झोपी गेली. त्या रात्री सोमनाथ अहल्याबाईच्या स्वप्नात आले व त्यांनी तिला दृष्टांत दिला, 'मी सध्या मुसलमानांच्या मशीदीत पडलो असून सध्या माझे मोठे हाल होत आहेत. त्यासाठी माझी काही व्यवस्था करावी.'

प्रभासपट्टण म्हणून जुनागड संस्थानात एक गाव आहे. तेथील सोमनाथाची मूर्ती फोडली गेली होती ! स्वप्नातील हकीगत पुन्हा पुन्हा मनात घोळवीत होती ती. तिने मूर्तीचा शोध लावला. त्यासाठी तिला केवढे कष्ट पडले ! पण अहल्याबाईने साऱ्या अडचणींना तोंड देऊन नवीन मंदिर बांधवून त्यात सोमनाथाच्या मूर्तीची स्थापना केली.

★

## १२

## सगळीकडे दुःखच दुःख !

अहल्याबाईचं जीवन म्हणजे दुःखाची एक मोठी कहाणीच आहे ! आयुष्यात तिच्या वाट्याला सुख फार कमी आले. पतिनिधनानंतर तिच्या आयुष्याचा रंगच पालटला. संसारसुख तिच्या नशिबातच नव्हतं. त्यानंतर सासरे मल्हारराव, सासूबाई गौतमाबाई, आणि एकुलता एक पुत्र मालेराव यांचे मृत्यू घडले. तसं पाहिलं तर मालेरावाने काहीच कर्तृत्व दाखविलं नाही. त्याने कधी नीट कारभारही केला नाही. त्याच्या नावे अहल्याबाईलाच सारा कारभार करावा लागला. मालेराव निपुत्रिकच वारला. तेव्हा अहल्याबाईशिवाय होळकरशाहीला कोणीच वारस नव्हता. होळकरांची प्रतिष्ठा कीर्ती अहल्याबाईने कायम राखली.

अहल्याबाईला एकच मुलगी होती. ती मालेरावापेक्षा तीन वर्षांनी लहान होती. तिचं नाव मुक्ताबाई. मालेराव वारल्यानंतर अहल्याबाईला हा एकच मायेचा पाश राहिला होता. अहल्याबाईने तिचं लग्न यशवंतराव फणसे नावाच्या एका सरदाराशी

लावून दिलं होतं. अहल्याबाईचा स्वत:च्या मालकीचा तराणा परगणा होता. तिने निलभांडारेश्वर नावाचं एक देऊळ बांधलं होतं. पुष्कळसे वृक्षही लावले होते. पुढे मुक्ताबाईचं जेव्हा लग्न झालं, तेव्हा अहल्याबाईने हा तराणा परगणा आपल्या मुलीस दिला. यशवंतरावाच्या हाताखाली पंधराशेची फौज असे ! आपल्याला जावई चांगला मिळाला ह्याचं अहल्याबाईला फार समाधान वाटे.

मुक्ताबाईला एक पुत्र झाला. त्याचं नाव धोंडिबा उर्फ नथ्याबा ठेवण्यात आलं ! 'ह्याला तरी दगडाधोंड्यांसारखं भक्कम दीर्घ आयुष्य मिळू दे.' अहल्याबाई खंडोबाची प्रार्थना करी. मालेरावबाबा गेल्यामुळे आपल्या मुलीचा मुलगा नथ्याबा ह्याच्यावर अहल्याबाईचा जीव जडला होता. त्यास होळकरांची गादी द्यायची असाही तिचा बेत होता. म्हणून ती त्याला फार जपे, त्याचे लाड करी. त्याच्यावर चांगले संस्कार घडावेत, त्याला चांगलं शिक्षण मिळावं म्हणून ती फार खबरदारी घेत असे. तिने त्याला माहेश्वराहून कुठे बाहेरही जाऊन दिलं नाही.

वयाच्या तेराव्या वर्षीच तिने नथ्याबाचं लग्न लावून दिलं. अहल्याबाईचे भाऊ शिंदे ह्यांच्या मुलाच्या मुलीची मुलगीच अहल्याबाईने नातसून म्हणून करून घेतली ! आपल्या मुलीचं सारं कुटुंबच अहल्याबाईने जवळ केलं होतं. नातवास, जावयास तिने कारभाराची माहिती करून दिली होती. नथ्याबावर तिच्या साऱ्या इच्छा-आकांक्षा केंद्रित झाल्या होत्या.

काही दिवसांनी नथ्याबाने आजीजवळ दुसऱ्या लग्नाचा हट्ट केला. तेव्हा आजीने त्याचं आणखी एक लग्न लावून दिलं. नथ्याबा हा जन्मापासूनच अतिशय अशक्त आणि दुबळा. त्याची प्रकृती

कधीही धड राहिली नाही. तरूणपणीच त्याला क्षयाची बाधा झाली. त्याला बरं वाटावं म्हणून अहल्याबाईने ठिकठिकाणहून वैद्य, हकीम बोलावले. तऱ्हतऱ्हेचे उपचार केले. पण छे ! त्याला गुण म्हणून आला नाही. नातू वाचावा म्हणून आजीने अक्षरश: जीवाचं रान केलं. पण नातू काही बिछाना सोडीना. दसरा, दिवाळी सण आले, गेले. उदार अहल्याबाईने नातवासाठी दानं केली. हत्ती दिला. दहा हजारांचा दानधर्म केला. पण ईश्वराची इच्छा निराळी होती. नथ्याबा त्या दुखण्यातून काही वाचला नाही. त्याच्या दोन्ही बायका लहान होत्या. अंगावर अलंकार घालून अंबारीत बसून मोठ्या समारंभाने त्या सती गेल्या. अहल्याबाईच्या जीवनातील दु:खाचा हा कळसच होता. ती स्वत: चालत चालत स्मशानात गेली. दोघी नातसुना सती जाताना पाहून तिने जोराची किंकाळीच फोडली. कशीतरी स्वत:ला सावरीत ती परत आली.

नथ्याबाच्या ह्या अकाली मृत्यूमुळे त्याच्या आई-वडिलांवर आणि त्यातल्या त्यात आजीवर केवढी दु:खाची कुऱ्हाड कोसळली! तिच्या साऱ्या स्वप्नांचा आशाआकांक्षांचा चुराडा झाला. मृत्यूने अहल्याबाईच्या जीवनात नुसता धुमाकूळ मांडला होता... पासष्टाव्या वर्षी नातवाचा मृत्यू आणि नातसुना सती गेलेल्या पाहणं ह्यापेक्षा आणखी दैवदुर्विलास तो कोणता ? तशी ती मनाने खंबीर म्हणूनच इतके दिवस तिने धडाडीने, कर्तबगारीने राज्यकारभार केला. पण आता मात्र ती फार खचून गेली. ‘अजून किती जणांचे मृत्यु मला पाहायचे आहेत...’ असे ती वैतागून ज्याच्या त्याच्याजवळ म्हणे ! कित्येक वेळा तिला तिचा स्वत:चा जीव नकोसा होई.

अहल्याबाईच्या भावास जाऊनही फार वर्षे झाली नव्हती. त्यात हा पुन्हा नातवाच्या मृत्युचा आघात. म्हातारपणी तिला दुर्दैवाचे दशावतार पाहावयाचें होते. ही दुःखसमाप्ति येथेच झाली नाही. अहल्याबाईचा जावई यशवंतराव फणसे हा कॉलन्याच्या आजाराने चार तासांत वारला.

यशवंतरावाच्या मृत्यूमुळे अहल्याबाईची मुलगी मुक्ताबाई हिला केवढं दुःख झाले. मुक्ताबाई ही आईसारखीच धार्मिक आणि ममताळू ! तिच्या दोन सुना, तिच्या डोळ्यांदेखत सती गेल्या. ती अशा प्रसंगी घरात स्वस्थ बसून शोक करणार का ? तिने मोठ्या उत्साहाने पतीबरोबर सहगमन करावयाची तयारी चालविली. अहल्याबाईच्या दुःखात आणखी भरच पडली. तिने परोपरीने मुक्ताबाईला सांगितलं, 'तू सती जाऊ नकोस.' राणीच्या नात्याने, आईच्या मायेने तिने मुक्ताबाईला खूप समजावून सांगितलं. पण मुक्ताबाईने आईचं म्हणणं ऐकलं नाही आपल्या आईवर तिची फार भक्ती होती. आपली मुलगी ऐकत नाही हे पाहून अहल्याबाईने शेवटचा उपाय करून पाहिला. तिने मुक्ताबाईपुढे आपलं मस्तक नम्र केलं. साष्टांग नमस्कार घातला आणि तिला काकुळतीने विनविलं, ' मुली परमेश्वराच्या ठायी तुझी जर खरोखरच भक्ती असेल तर तुझ्या आईला म्हातारपणी या संसारात एकटी आणि निराश्रित अशी सोडू नकोस !

बाळ, खूप वर्षांपूर्वी माझ्यावरसुद्धा असा प्रसंग आला होता. मी सती चालले होते ! असाच तुझ्यासारखा प्रसंग माझ्यावरही आला होता. पण मामंजींची आज्ञा पाळली मी ! मामंजींची आज्ञा आणि प्रजाहित हे मला कर्तव्य वाटलं. त्यासाठी जगले मी बेटा ! मुक्ते, तुझ्या माघारी मी कुणासाठी जगू ? कशासाठी

जगू ? मला म्हातारीला टाकून तू कुठे चाललीस ग मुक्ताबाई ?'

पण आईच्या ह्या समजावणीचा मुक्ताबाईंवर काहीही परिणाम झाला नाही.

'आई, तू गंगेसारखी निर्मळ आणि पवित्र. तू कसले माझे पाय धरतेस ! माझं एकुलतं एक पोर गेलं आणि आता तर माझं सौभाग्यही संपलं. कशासाठी आणि कुणासाठी जगू ? आई आता तुझं म्हातारपण आलं आहे. चार दिवसांची तू सोबतीण ! तू पुण्यवान बाई आहेस. तुझी प्रजा तुझ्या लेकरांसारखी. तुला काही कमी पडणार नाही. थोड्या दिवसांनी तूही मला सोडून गेलीस तर मी कुणाकडे पाहू ? माझा बेटा गेला, नवरा गेला. कशासाठी जगू मी ? आज कशी सोन्यासारखी संधी आली आहे. ही जर दवडली तर माझ्यासारखी मूर्ख कोणीच नाही !'

मुक्ताबाई आता मुक्त झाली होती. पती हेच आपलं दैवत ही तिची समजूत. सहगमन करणे हा पतिव्रता स्त्रियांचा श्रेष्ठ धर्म ही तिची श्रद्धा.

मुक्ताबाईचं बोलणं ऐकून अहल्याबाईला विवेक सुचला. तिने धैर्य गोळा केलं. आयुष्यात अनेक संकटांशी तिने खंबीरपणे सामना केला. आता आणखी एक संकट पुढे ठाकलं होतं ! त्याला तोंड देणं भाग होतं. तिला आपल्या कुलधर्माची जाणीव झाली. कर्तव्याचं ज्ञान झालं आणि ही वीरांगना संकटांचा मुकाबला करण्यास सिद्ध झाली ! डोळ्यातील अश्रू तिने पुसून टाकले आणि ती मुक्ताबाईपासून दूर झाली.

यशवंतरावाचं शव जेव्हा बाहेर निघालं तेव्हा अहल्याबाई त्या यात्रेबरोबर निघाली. मुलीजवळ उभी राहिली. चंदनाची चिता रचली गेली. चितेभोवती हजारो प्रजाजन डोळ्यांतील अश्रूंना आवरीत उभे होते. अहल्याबाई दुःखाने कोलमडून गेली

होती. दोघा ब्राह्मणांनी तिला धरून उभं केलं होतं. ह्या वृद्ध माऊलीने मोठ्या धैर्याने स्वतःला सावरून धरले होते. चंदनाची चिता रचली गेली. समोर चिता पेटलेली पाहिली तेव्हा तिचं देहभान हरपलं. स्वतःच्या डोळ्यांनी एकुलती एक कन्या चितेवर चढलेली पाहणं ह्यासारखं दुर्दैव ते कोणतं ? अहल्याबाईने खूप शोक केला. टाहो फोडला. ऊर बडवला. शेवटी मात्र तिची शुद्ध गेली. सेवकांनी वारा घालून तिला सावध केलं ! दैवाची लीला किती क्रूर आहे. यशवंतराव आपल्या पत्नीस घेऊन गेला पण जाताना ह्या साध्वीस कायमचा शोकसागरात लोटून गेला.

दहनविधी आटोपल्यावर ती सर्व मंडळी नदीवर स्नानासाठी गेली. अहल्याबाईने नर्मदेत स्नान केलं नंतर ती वाड्यात आली. ह्या दुःखाचा तिच्यावर फार परिणाम झाला. अन्नपाण्याला तिने स्पर्श केला नाही. कुणाशी भाषण केलं नाही. तिला वाटू लागलं, आपण आत सर्व सोडून महायात्रेस निघून जावं.

तुकोजीला ही सारी हकीगत समजली. त्याला कळलं, अहल्याबाई तोंडात पाणीही घालीत नाही. हे ऐकून त्याला फार वाईट वाटलं. त्याने काशीरावाला पत्र लिहून कळवलं,

'ती जेवीत नसली तर तुम्हीही जेऊ नका. तुम्ही तिला सांभाळा !'

अहल्याबाई विचारी, तिने विवेक सांभाळला. गंगाजल निर्मळ अहल्याबाईचं समाधान सर्वांनी केलं. जसजसं तिचं दुःख हलकं होऊ लागलं तसतशी ती इतर व्यवसायात आपलं मन गुंतवू लागली. शेवटी काळाचं औषध मोठं गुणकारी आहे. शोकाचा आवेग ओसरल्यावर मुक्ताबाईच्या स्मरणार्थ तिने घाट आणि एक सुंदर छत्री बांधली व पन्नास हजार रुपयांचा दानधर्म केला.

★

१३

## अवतार संपला

रक्ताची सारी नाती एकामागून एक गळून पडली. मृत्यूने घाला घालून एकामागून एक प्रिय माणसं अहल्याबाईपासून हिरावून नेली. जवळची अशी राहिली नणंद उदाबाई वाघमारे, मल्हाररावजीची हरकूबाई आणि सासऱ्याचा नातू भलारामदादा. तुकोजी होळकर तसा तिचा जवळचा नातेवाईक. अहल्याबाईपेक्षा तो वयाने मोठा. तसे त्याचे आणि अहल्याबाईचे मतभेदही फार. पण तरीसुद्धा तो अहल्याबाईला मातेसमान मान देई. तुकोजीच्या पत्नीचं आणि अहल्याबाईचं विशेष पटत नसे. तुकोजीच्या मुलांपैकी मल्हारराव बाईंचा फार लाडका. पण अहल्याबाईंच्या नशिबात त्याच्याकडूनही सुख नव्हतं. बापाने त्याचे फार लाड केले. तो फारच बिघडला आणि मन मानेल तसा वागू लागला. त्याच्याबद्दल अहल्याबाईकडे सारख्या तक्रारी येऊ लागल्या. शेवटी तर अहल्याबाईने त्याला अटक करविलं! तुकोजी ह्यावेळी फारच थकला होता. त्याच्याकडे बघून अहल्याबाईने अखेर त्याची

सुटका केली.

अहल्याबाईला दोघे बंधू होते. शहाजी व महादजी शिंदे त्यांना अहल्याबाईने स्वतःच्या नोकरीत घेतलं होतं. ते दोघेही तिच्या हयातीतच वारले.

आता तीही फार थकली होती. जन्मभर संकटं सहन करीत करीतच ती आयुष्याची वाटचाल चालत होती. प्रजा हीच तिची संतती आणि तीच प्रजेची माता. त्या प्रजेला सुखी करण्यातच तिनं आपलं सारं आयुष्य वेचलं! तिची परोपकारी आणि उदार बुद्धी ह्याला तोड नाही. ब्राह्मणांना गोरगरिबांना ती नेहमी अन्नदान करी. थंडीच्या दिवसांत कुडकुडणाऱ्या भिकाऱ्यांना गरम कपडे, घोंगड्या वाटण्याची व्यवस्था करी. ब्राह्मणभोजन घालण्याची तिला फार हौस. पशुपक्ष्यांना आणि माशांनाही ती रामनामाच्या कणकेच्या गोळ्या टाकी. कित्येक देवळांचा तिने जीर्णोद्धार केला. धर्मशाळा, बागा, घाट विहिरी बांधल्या. तिच्या औदार्याला सीमा नव्हती. काठेवाडातील श्री सोरटी सोमनाथ, मद्रासकडील श्री मल्लीकार्जून, मध्यभारतातील ओंकारेश्वर, परळी वैजनाथ, औंढ्यानागनाथ, काशीविश्वनाथ, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, गोकर्ण, महाबळेश्वर, उज्जैनचा महाकाळेश्वर, दक्षिणेचा रामेश्वर, सह्याद्रीतील भीमाशंकर ह्या साऱ्या तीर्थस्थानांच्या जागी तिने काही ना काही सत्कृत्य केलं. काही मूर्तींचा जीर्णोद्धार केला.

अशाप्रकारे धर्माचरणात अहल्याबाईने अफाट संपत्ती खर्च केली. तिचं जीवनच मुळी लोकांच्या सेवेसाठी, कल्याणासाठी होतं.

श्रावण महिना अहल्याबाईच्या दानधर्माचा आवडता महिना. उल्हासाचा महिना. महाराष्ट्रातही तिने आपल्या दानधर्माचा, उदारवृत्तीचा सुगंध दरवळून टाकला. पंढरपूर, कोल्हापूर, नाशिक जेजुरी, वेरुळ, चिंचवड, पुणतांबे ह्या साऱ्या ठिकाणी अहल्याबाईच्या सत्कृत्याचं दर्शन आपल्याला होतं.

अहल्याबाई आता सत्तरीच्या जवळ आली. प्रियजनांचे मृत्यू डोळ्यादेखत पाहून ती अतिशय दुःखीकष्टी उदास झाली. कडक उपासतापासामुळे तिचं शरीर झिजत झिजतच चाललं होतं. तुकोजी थकला होता. महादजी शिंद्यांच्या मृत्यूमुळे तोही आधार संपला होता. हळूहळू राज्यकारभारातून मन काढून ती शांतपणे मृत्यूला सामोरी चालली होती !

मधूनमधून तिला वाटे, कुठेतरी यात्रेला निघून जावं ! तेवढाच मनाला उल्हास वाटेल. आता तिला कशातच रस वाटत नव्हता. सगळीकडे निराशेचे ढग पसरले होते. तिला एक प्रकारचं वैराग्य आलं होतं. एकदा तिने लक्ष्मण मल्हार आणि नागोपंतांबरोबर तुकोजीकडे निरोप पाठविला.

'कोणी सरदार करा. चिरंजीव मल्हारराव किंवा काशीबा कारभारी नेमा. दौलत चालवा. मी कुठेतरी तीर्थास निघून जाईन !'

ह्या साऱ्या नैराश्यात अहल्याबाईच्या कानावर खडर्याच्या लढाईत मराठ्यांनी एकजूट करून निजामावर मिळवलेल्या विजयाची आनंदाची बातमी आली. तिला तेवढंच बरं वाटलं !

आता अहल्याबाईला काळाची चाहूल लागली होती. सारी निरवानिरव करून झाली ! पारनेरकर, शिवाजी गोपाळ, खंडो महादेव वगैरे मंडळींना तिने बोलावून घेतलं. सर्वांना मोठ्या

कळकळीने सांगितलं, 'तुम्ही दप्तरचे काम करावे. कारभारात बोलू नये, कुणी कुणाचा द्वेष करू नका. सर्वांनी एकचित्ताने राहून आपली कामे करून आपली दौलत सांभाळावी. मागील गोष्ट झाली ती झाली. तिचे वैभव मनात स्मरू नये. वाहिली गंगा राहिले तीर्थ असे आचरण असावे.'

असं निरवानिरवीचं बोलून कचेरी बरखास्त झाली. अनेक सरदारांना भोजन देऊन वस्त्रेभेट दिली.

१३ ऑगस्ट १७९५ चा दिवस. वाड्यात आणि वाड्याबाहेर देवीच्या दर्शनासाठी प्रजाजनांची एकच गर्दी उडाली. मातुःश्री अहल्याबाई अखेरच्या घटका मोजीत होत्या. मृत्यूच्या क्षणापूर्वी तिने सावधान राखून बारातेरा हजार पानं जेवण्याचा संकल्प सोडला. आसन्नकाळी मोक्ष धेनूंचं दान केलं. नामस्मरणाचा घोष चालला होता. आपल्या लाडक्या प्रजेवर अखेरचा कृपाकटाक्ष टाकून अहल्याबाईने सर्वांचा प्रेमाने निरोप घेतला. नामस्मरणाच्या घोषात अहल्याबाईने स्वर्गारोहण केलं.

प्रजा पोरकी झाली. सर्वांच्या पाठीवरून मायेने फिरणारा हात आज निघून गेला होता. भुकेलेल्यांना अन्न देणारे थंडीने कुडकुडणाऱ्यांना वस्त्र देणारे, तृषार्तांना पाणी देणारे, देवळांचा जीर्णोद्धार करणारे आणि प्रजेसाठी सत्कृत्ये करणारे ते उदार हात आज चिरविश्रांती घेत होते, तिच्या मृत्यूसमयी तुकोबा होळकर तिथे नव्हता. त्याचा धाकटा भाऊ संताजी सेंधव्याचा किल्लेदार हाच जवळ होता. त्यानेच बाईचं उत्तरकार्य केलं.

अहल्याबाईच्या मृत्यूमुळे होळकर संस्थानचा आत्माच नाहीसा झाला.

वाड्यात सगळीकडे हाहाकार माजला. तिच्या गुणांची आठवण करून जो तो अश्रू ढाळीत होता.

'देवा, तू आमची आई घेऊन गेलास ! आता आम्हाला अन्नछत्रं कोण घालणार ?'

'आम्हा गरिबांना थंडीत घोंगडी कोण देणार ?

'आम्हा ब्राह्मणांना दानधर्म कोण देणार ?'

'आम्हा पुजाऱ्यांना पूजेची व्यवस्था करून कोण देणार ?'

'आम्हा यात्रेकरूसाठी रस्ते कोण बांधणार ? धर्मशाळा कोण बांधणार ? तलाव विहिरी कोण खोदणार ?'

सगळीकडे लोक दुःखित अंतःकरणाने अश्रू ढाळीत होते. वाड्यात येऊन त्या साध्वीचं—पुण्यश्लोक अहल्येचं दर्शन घेत होते. संकटांना तोंड देऊन थकलेलं शरीर शांतपणे चिरविश्रांती घेत होतं.

घरच्या गाईने पाहिलं मालकीण हलत नाही. बोलत नाही. आपली चालत नाही ! ती गोमाता संभ्रमात पडली, असं का ? कुठे चालली आपली मालकीण ? त्या मुक्या प्राण्याच्या डोक्यात वीज चमकली. दुःखाने हंबरडा फोडून तिने तिथेच प्राण सोडला !

अश्रू पुसता पुसता लोक क्षणभर एकमेकांकडे टकमका पाहू लागले.

म. ग्रं. सं. ठाणे,
वा. क्र. ...९९९२
विषय १६३०२
BVBK-0401111